पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ● वर्ष १६ ● अंक ८० ● शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

## विश्वासाची 25 वर्षे...

### लोकशाहीचा बुलंद पहारेकरी,

## जनमानसाचा आरसा आरआरसी नेटवर्क !

कोणताही प्रवास हा कधीच सरधोपट किंवा सोपा नसतो. त्यात सातत्य, प्रामाणिक प्रयत्न, ध्येयाप्रती अचल निष्ठा, सर्वांना सोबत घेऊन चालण्याची सर्वसमावेशक वृत्ती आणि सर्वात महत्त्वाची म्हणजे 'विश्वासार्हता' यावी लागते. एखादी संस्था जेव्हा सलग २५ वर्षांहून अधिक काळ एक-एक यशोशिखर सर करत अत्यंत दिमाखात यशस्वी वाटचाल करते, तेव्हा तो इतिहास केवळ एका संस्थेचा राहत नाही, तर तो एका प्रेरणादायी संघर्षाचा आणि लोकविश्वासाचा सुवर्णमहोत्सव ठरतो. हा सुवर्णप्रवास आहे, वृत्तपत्र आणि प्रसारमाध्यम क्षेत्रात महाराष्ट्राचा मानबिंदू ठरलेल्या एका अत्यंत लोकप्रिय सायं दैनिक 'सिटी न्यूज सुपरफास्ट' आणि जनमानसाच्या लाडक्या 'आरआरसी समुह 'च्या प्रदीर्घ विश्वासार्हतेचा आणि अभूतपूर्व यशाचा !



दोन तपांपेक्षा अधिक म्हणजेच २५ वर्षांचा हा रोमहर्षक कालखंड हा केवळ कागदावरील आकड्यांचा खेळ नाही; तर हा एका निष्ठावान संस्थेच्या निरंतर सातत्याचा, लोककल्याणकारी मूल्यांचा आणि जनतेशी जोडलेल्या जिव्हाळ्याच्या अतूट नात्याचा जिवंत ठसा आहे. 'सेवा आमची, करमणूक तुमची' या अत्यंत सार्थ ब्रीदवाक्याला प्राणपणाने जपत आरआरसी समुहाने स्थानिक पत्रकारिता, डिजिटल मनोरंजन आणि तळागाळातील माहितीच्या विश्वात आपली स्वतंत्र, ठळक आणि अमिट छाप उमटवली आहे. २५ वर्षांपूर्वी श्री. प्रदीप उर्फ बंडूभाऊ देशमुख यांनी अकोल्याचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वरांच्या पवित्र नावाने सुरू केलेल्या 'श्री राजराजेश्वर केबल' (आरआरसी) या अत्यंत छोट्याशा रोपट्याचा आज ५ जिल्ह्यांमध्ये पसरलेला एक भव्य आणि सशक्त वटवृक्ष झाला आहे. आजच्या घडीला दर महिन्याला सोशल मीडियावर कोट्यवधी फॉलोअर्सचा भक्कम आणि आश्वस्त करणारा पाठिंबा या संस्थेला लाभला आहे. त्याचबरोबर, रोज न चुकता हजारो प्रेक्षक केबल, फेसबुक आणि युट्यूबच्या अत्याधुनिक माध्यमातून आरआरसीच्या परखड आणि निर्भीड बातम्या नियमित पाहतात, हीच या माध्यमाची खरी आणि सर्वोच्च पावती आहे.

केवळ मनोरंजनाच्या चौकटीत न अडकता, अन्यायाविरुद्ध पेटून उठणे आणि तळागाळातील बातम्यांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने समाज परिवर्तन घडवून आणणे हीच आरआरसीची मूळ ताकद राहिली आहे. अनेक प्रकरणात आरआरसीने अत्यंत आक्रमक भूमिका घेत हा लढा हाती घेतला आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी त्याचा दणदणीत पराभव घडवून आणला. असे अनेक ज्वलंत सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्न अत्यंत प्रामाणिकपणे आणि निर्भीडपणे मांडून आरआरसीने स्थानिक पत्रकारितेला केवळ मते मांडण्याचे साधन नाही, (पान २ वर)

# अखेर राज्यात दुष्काळ जाहीर!

## मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा: 265 तालुके दुष्काळग्रस्त

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**मुंबई :** यंदाच्या पावसाळ्यात सुरुवातीपासूनच मान्सूनने ओढ दिल्याने राज्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील अनेक भागात पाऊस आणि पाण्याअभावी पिके करपून गेली आहेत. तर अपुऱ्या पावसामुळे पुढच्या काही महिन्यात राज्यातील अनेक भागात भीषण पाणीटंचाई निर्माण होईल, अशी शक्यता दिसत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्य सरकारमधील मंत्र्यांनी दुष्काळी भागांची पाहणी करून परिस्थितीची आढावा घेतला होता.

त्यानंतर आज, शनिवार, २६ सप्टेंबर रोजी राज्य सरकारने राज्यामध्ये दुष्काळ पडल्याचे जाहीर केले आहे. राज्यातील सुमारे २६५ तालुके दुष्काळग्रस्त असल्याची घोषणा राज्य सरकारकडून करण्यात आली आहे.

यावर्षी राज्यात पावसाला उशिराने सुरुवात झाली होती, तसेच पर्जन्यमानही सुरुवातीपासूनच सरासरीपेक्षा कमी होते. जूननंतर जुलै आणि ऑगस्ट महिन्यात राज्यामध्ये म्हणावी तशी पर्जन्यवृष्टी झाली नाही. तसेच सप्टेंबर महिनाही तुरळक ठिकाणी झालेला पाऊस वगळता कोरडा गेला आहेत. त्यामुळे खरिपाच्या हंगामातील शेतातील पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसह विरोधी पक्षांच्या नेत्यांकडून राज्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करण्यात येत होती. अखेर राज्य सरकारने राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ पडल्याची घोषणा केली आहे. या तालुक्यांचा विस्तार पाहिल्यास राज्यातील सुमारे ७५ टक्के भागात दुष्काळ जाहीर झाला आहे.

### अमरावती विभागातील तालुके

**बुलडाणा :** जळगावजामोद, संग्रामपूर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापूर, मोताळा, नांदुरा.

**अमरावती :** अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापूर.

**अकोला :** अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मूर्तिजापूर, बाळापूर, बार्शिटाकळी.

**वाशिम :** वाशिम, रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, कारंजा, मानोरा.

**यवतमाळ :** यवतमाळ, बाभूळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी जामणी, केळापूर, घाटंजी, राळेगाव.



### अशा राहणार उपाययोजना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळ जाहीर केल्यानंतर आता या दुष्काळग्रस्त भागामध्ये राज्य सरकारकडून दुष्काळग्रस्त शेतकरी आणि जनतेला मदत करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत. त्यामध्ये पीक कर्जांचे पुनर्गठण, जमीन महसूलात सवलत, शालेय विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी, वीज पंपांच्या बिलात सवलत, जलसंधारणाच्या कामांना गती, दुष्काळामुळे वाळलेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देणे यासारखी कामे केली जाणार आहेत.

# सामान्यांना न्याय देणारे 'देवा भाऊ' जननायक!



## आ. सावरकरांकडून अभिनंदन

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

अकोला: राज्याच्या १४ कोटी जनतेच्या कल्याणासाठी अहोरात्र झटणारे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच वाशिम जिल्ह्यातील कारंजा व मानोरा येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन थेट संवाद साधला होता. यावेळी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत त्यांनी 'उद्याच जीआर काढतो,' असा शब्द दिला होता. विशेष म्हणजे, गणेश विसर्जनाच्या पवित्र दिवशी मुंबईत सर्वत्र धावपळ असताना आणि उत्सवाचे वातावरण असतानाही शब्दाला पक्के असणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातून तत्काळ शासन निर्णय (जीआर) निर्गमित करत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आणि दिलेला शब्द पाळला.

शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीज बिल सवलत, महिलांचे सबलीकरण आणि शेतातील पांदण रस्ते यांसारखे अनेक महत्त्वाचे निर्णय घेत महायुती सरकार सतत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी राहिली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक शेतकऱ्यांना मदत देणारे नेते म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करत, ते सामान्यांना न्याय देणारे खरे जननायक असल्याचे आमदार रणधीर सावरकर यांनी म्हटले आहे.

पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांच्या वतीने आमदार रणधीर सावरकर आणि खासदार अनुप धोत्रे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, तसेच मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे व सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. केवळ पोकळ घोषणा न करता, प्रत्यक्ष कृतीतून शेतकऱ्यांचे नवरात्र,दसरा - दिवाळी गोड व्हावी यासाठी उचललेल्या या पावलाचे सर्वत्र स्वागत होत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा २
शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

## पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य हवे

पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य दिले जावे अशी मागणी पर्यावरण प्रेमी करीत आहेत. उन्हाळ्यातील तीव्र उष्णतामान कमी होण्यासाठी उपाय योजना करणे आवश्यक आहे अशी भावना व्यक्त केली जात आहे.

सभोवतालचे नैसर्गिक आवरण, हवा, पाणी आणि वनांचे रक्षण करणे होय. यामध्ये अधिक झाडे लावणे, पाणी व ऊर्जेची बचत करणे आणि कचरा कमी करणे या मुख्य उपायांचा समावेश होतो.

पर्यावरण संरक्षणासाठी अधिक रोपे लावणे आणि वृक्षतोड थांबवणे, पाणी आणि विजेचा कमी व योग्य वापर करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि वस्तूंचा पुनर्वापर करणे, गाडीऐवजी चालत जाणे, सायकलीचा वापर करणे किंवा सार्वजनिक वाहतुकीची निवड करणे, पर्यावरण सुरक्षा म्हणजे आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक आवरणाला संरक्षण देणे आणि ते जीवनासाठी अनुकूल ठेवणे. पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करण्याच्या उद्देशाने १९८६ मध्ये हा कायदा करण्यात आला.

# निसर्ग अस्वस्थ असेल तर मानवी समाज निरोगी राहू शकत नाही!

जागतिक पर्यावरण आरोग्य दिन दरवर्षी २६ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. मानवी आरोग्य आणि पर्यावरण यांच्यातील घनिष्ठ संबंध समजून घेणे आणि स्वच्छ व सुरक्षित पर्यावरणाच्या गरजेबद्दल जागरूकता पसरवणे हा या दिवसाचा उद्देश आहे. मानवी अस्तित्व आणि निसर्ग यांचा परस्परसंबंध अत्यंत खोल आणि अविभाज्य आहे. आपल्याला श्वासासाठी मिळणारी हवा, पिण्यासाठी मिळणारे पाणी आणि अन्नासाठी लागणारी सुपीक जमीन या सर्व गोष्टी आपल्याला निसर्गाकडूनच मिळतात. मात्र, आजच्या आधुनिक आणि औद्योगिकीकरणाच्या युगात मानवाने आपल्या स्वार्थासाठी निसर्गाचा समतोल मोठ्या प्रमाणावर बिघडवला आहे. याच पार्श्वभूमीवर मानवी आरोग्य आणि पर्यावरणातील परस्परसंबंधांची जाणीव करून देण्यासाठी तसेच सुरक्षित व स्वच्छ पर्यावरणाची गरज अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी २६ सप्टेंबर रोजी 'जागतिक पर्यावरण आरोग्य दिन' आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो.

## आज जागतिक पर्यावरण आरोग्य दिन



### स्वच्छ ऊर्जा आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाची गरज

पर्यावरणीय आरोग्य सुधारण्यासाठी आणि मानवी जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी स्वच्छ ऊर्जा आणि योग्य कचरा व्यवस्थापन अत्यंत आवश्यक आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या पुनर्वापरयोग्य ऊर्जेच्या स्रोतांचा वापर वाढवून आपण कर्ब उत्सर्जनाचे प्रमाण कमी करू शकतो. याशिवाय, दैनंदिन जीवनात ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, सिंगल-यूज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणे आणि पुनर्वापराची संस्कृती रुजवणे काळाची गरज बनली आहे. स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी सर्वांपर्यंत पोहोचवणे हे देखील पर्यावरणीय आरोग्याचे एक महत्त्वाचे अंग आहे.

या दिवसाची सुरुवात इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ एन्व्हायर्नमेंटल हेल्थद्वारे करण्यात आली होती. पर्यावरणातील बिघाडामुळे मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांकडे जगाचे लक्ष वेधणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. निसर्ग अस्वस्थ असेल तर मानवी समाज कधीही निरोगी राहू शकत नाही, हा महत्त्वाचा धडा हा दिवस आपल्याला शिकवतो. आपण सर्वांनी एकत्र येऊन हरित जीवनशैलीचा अवलंब केला, तरच आपण आजारमुक्त समाज आणि निरोगी पर्यावरणाची निर्मिती करू शकू. चला तर मग, या जागतिक पर्यावरण आरोग्य दिनानिमित्त संकल्प करूया – पर्यावरण वाचवूया, आरोग्य टिकवूया!

### प्रदूषण, हवामान बदल आणि आरोग्यविषयक धोके

आज जगभरात वाढते वायुप्रदूषण, दूषित पाण्याचा पुरवठा, प्लास्टिक कचऱ्याची समस्या, बेसुमार जंगलतोड आणि वेगाने होणारा हवामान बदल यांसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. या पर्यावरणीय समस्या केवळ निसर्गाचे सौंदर्य नष्ट करत नाहीत, तर मानवी शरीरावर आणि आरोग्यावर त्यांचा थेट घातक परिणाम होत आहे. दूषित हवेमुळे श्वसनाचे आजार, फुफ्फुसांचे विकार आणि कर्करोगासारखे आजार बळावत आहेत. तसेच, दूषित पाण्यामुळे पोटाचे विकार आणि साथीचे आजार पसरत आहेत. प्लास्टिक कचऱ्यामुळे सूक्ष्म प्लास्टिक आपल्या अन्नसाखळीत प्रवेश करत आहे, जे मानवी शरीरासाठी अत्यंत धोकादायक आहे. जर आपण आजच या पर्यावरणीय धोक्यांकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यात मानवजातीला मोठ्या आरोग्यविषयक संकटांचा सामना करावा लागेल.

### भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि हरित भविष्याची प्रतिज्ञा

जागतिक पर्यावरण आरोग्य दिन हा केवळ भाषणे देण्याचा किंवा उपक्रम राबवण्याचा दिवस नाही, तर तो आपल्या भावी पिढ्यांसाठी एक सुरक्षित, स्वच्छ आणि हरित जग सोडून जाण्याची प्रतिज्ञा घेण्याचा दिवस आहे. निसर्गाचा आदर करणे आणि त्याचे रक्षण करणे हाच आपल्या स्वतःच्या आरोग्याचा आणि आयुष्याचा खरा विमा आहे.

### सामाजिक जनजागृती आणि सामूहिक जबाबदारी

२६ सप्टेंबर रोजी जागतिक पर्यावरण आरोग्य दिनाचे औचित्य साधून जगभरात विविध शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना, आणि शासकीय संस्थांमार्फत अनेक जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शाळा व महाविद्यालयांमध्ये कार्यशाळा, चर्चासत्रे, निबंध व वक्तृत्व स्पर्धा, तसेच वृक्षारोपणाचे उपक्रम राबवले जातात. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, पर्यावरण रक्षण ही केवळ सरकारची किंवा सामाजिक संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपण आपल्या दैनंदिन सवयींमध्ये छोटे-छोटे बदल करूनही पर्यावरणाच्या रक्षणात मोठे योगदान देऊ शकतो. झाडे लावणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे यांसारख्या सवयी आपल्याला निरोगी भविष्याकडे घेऊन जाऊ शकतात.

## "आर. आर. सी. न्यूज" म्हणजे अकोल्याच्या पत्रकारिता क्षेत्रातील मानाचे पान

" आर. आर. सी. न्यूज " व " सिटी न्यूज सुपर फास्ट " सायं दैनिक म्हणजे अकोल्याच्या पत्रकारिता क्षेत्रातील एक मानाचे पान आहे. या समूहाने मागील 25 वर्षात अकोल्याच्या विकासासोबतच सामाजिक समस्या व अनेक जनपयोगी मुद्द्यांना हात घालून जनमानसात एक विश्वासाचे व आधाराचे स्थान निर्माण केले आहे. असे मत व शुभेच्छा अखिल भारतीय लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार प्रदीप खाडे यांनी व्यक्त केल्या आहेत.

या समूहाची स्थापना करणारे प्रदीप देशमुख म्हणजे मुळातच सिमेंट, गिट्टी, मुरूम, लोहा लोखंड आदींमध्ये वावरणारे एक व्यक्तिमत्व. त्यांच्या या क्षेत्राचा पत्रकारिता क्षेत्राशी कोसो दूर संबंध नाही. परंतु प्रदीप भाऊंनी या क्षेत्रात प्रवेश करून एक सफल व यशस्वी वाटचाल सुरू केली आहे. केवळ वाटचालच सुरू केली नसून त्यात दिवसेंगणिक प्रगतीची शिखरे पदाक्रांत केली आहेत. अकोल्यात अनेकांनी सायं दैनिके काढण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना फारसे यश मिळाले नाही. व शेवटी त्यांना ती दैनिके बंद करावी लागली. परंतु प्रदीप देशमुख यांनी अनेक चढउतारांशी सामना करीत आजच्या जबरदस्त स्पर्धेच्या युगात आपले अस्तित्व कायम ठेवण्यात यश मिळविले आहे. सायंकाळ झाली की, अकोल्याच्या ताज्या घडामोडी वाचण्याकरिता वाचक त्यांच्या सायं दैनिकाची वाट बघतात. वाचकांची ही आतुरता त्यांच्यावरील विश्वासाची, आपुलकीची व यशाची पावती आहे. आजच्या परिस्थितीत वृत्तपत्र चालविणे म्हणजे सोपी गोष्ट नाही. कागद व प्रिंटिंग चे आकाशाला भिडलेले दर, त्यात कार्यरत कर्मचाऱ्यांचा पगार, त्यात भरीस भर म्हणजे आजच्या डिजिटल युगामुळे जाहिरातींचा कमी झालेला ओघ. या सर्वांमुळे आता आवक कमी व खर्च जास्त अशी वृत्तपत्रांची परिस्थिती झालेली आहे. त्यामुळे अकोल्यातील अनेक दिग्गज व्यक्तीमत्त्वांनी सुरू केलेली वृत्तपत्रे आज बंद पडली आहेत. परंतु अशाही परिस्थितीत प्रदीप देशमुख परिवाराने नफ्या तोट्याची पर्वा न करता आपल्या पत्रकारितेचे अखंड व्रत सुरू ठेवून व " टायगर अभी जिंदा है " हा मेसेज देऊन वृत्तपत्रसृष्टीमध्ये आपले पाय घट्ट रोवून ठेवले आहेत. आज त्यांच्या या प्रयासास पंकज देशमुख यांची यथार्थ व आशादायी साथ त्यांना मिळत आहे. सोबतच या समूहात काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांची सुद्धा त्यांना चांगली साथ मिळत आहे. परिणामी हा वेलू गगनाकडे वाटचाल करीत आहे. त्यांच्या या यशाची वाटचाल अशीच सुरु राहो. हीच प्रभू चरणी प्रार्थना व या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शुभेच्छा.



प्रदीप खाडे
अकोला

## तर थेट जनतेच्या बुलंद आवाजाचे एकमेव हक्काचे व्यासपीठ बनवले आहे

लोकशाहीच्या पवित्र मंदिरासाठी सजग आणि निष्पक्ष पत्रकारिता ही काळाची गरज असते. विधानसभा असो वा लोकसभा निवडणुका, प्रत्येक राजकीय टप्प्यावर आरआरसीने मतदारांच्या हक्कांना आणि जनहिताला सर्वोच्च प्राधान्य देत केलेले प्रामाणिक वृत्तांकन थेट समाजमनावर खोलवर ठसा उमटवणारे ठरले आहे. लोकांचे खरे प्रश्न, त्यांचे हक्क आणि त्यांचे हक्काचे मुद्दे चोहोबाजूंनी अधोरेखित करणे हीच पत्रकारितेची खरी आणि अंतिम नैतिक जबाबदारी मानून, आरआरसी आगामी जिल्हा परिषद व महानगरपालिका निवडणुकांमध्येही याच जनपक्षीय भूमिकेला अधिक ताकदीने पुढे नेणार यात शंका नाही.

आजच्या वेगाने बदलत्या आणि क्षणाक्षणाला स्पर्धात्मक बनलेल्या डिजिटल युगात अनेक माध्यमे प्रचंड वेगाने उदयाला येतात आणि तितक्याच वेगाने नामशेष होतात. मात्र, या प्रचंड उलथापालथीच्या काळातही आरआरसी नेटवर्कने गेली अडीच दशके प्रेक्षकांचा अढळ विश्वास आणि निखळ आदर जपला आहे. हे यश केवळ यंत्रसामग्रीच्या तांत्रिक कौशल्यामुळे मिळालेले नाही, तर प्रेक्षकांच्या सुप्त अपेक्षा तंतोतंत समजून घेत अत्यंत दर्जेदार, निष्पक्ष आणि टोकदार कार्यक्रम सादर करण्याच्या ठाम निष्ठेमुळे साध्य झाले आहे. ताज्या घडामोडींच्या बातम्या असोत, समृद्ध सांस्कृतिक कार्यक्रम असोत की थेट जनतेच्या जिव्हाळ्याचे समाजोपयोगी उपक्रम असोत, आरआरसीने प्रत्येक क्षेत्रात आपले अजेय नेतृत्व सिद्ध केले आहे.

अमृतासुन गोड अशा २५ व्या वर्षाचा हा टप्पा म्हणजेच रौप्यमहोत्सवाकडे टाकलेले अतिशय भक्कम, स्वाभिमानी आणि विजयी पाऊल आहे. हा प्रवास केवळ एका संस्थेचा

पान १ वरून




नाही, तर अहोरात्र श्रमणारे केबल ऑपरेटर्स, दूरगामी विचार करणारे जाहिरातदार, पाठीशी उभे राहणारे हितचिंतक आणि या सर्वांच्या केंद्रबिंदू असणाऱ्या लाखो प्रेक्षकांच्या सामूहिक विश्वासाचा सुवर्णसंगम आहे. अकोल्याच्या मातीतून सुरू झालेला हा प्रवास आज केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर वाशिम, अमरावती, खामगाव, बुलढाणा आणि यवतमाळ या संपूर्ण पश्चिम विदर्भातील प्रमुख जिल्ह्यांमध्ये सायं दैनिक 'सिटी न्यूज सुपरफास्ट'व 'आरआरसी न्यूज' च्या माध्यमातून आरआरसीने जनमानसात आपले अजेय साम्राज्य निर्माण केले आहे. भविष्यात केवळ प्रादेशिक सीमांवर न थांबता थेट मुंबई, पुणे,नाशिक व नागपूर या मेट्रो शहरांशी जोडले जाणे हे आता स्वप्न राहिलेले नाही, तर ते वास्तवाच्या अत्यंत उंबरठ्यावर उभे असलेले अटळ ध्येय आहे.

आरआरसीचे कार्य केवळ वृत्तपत्र किंवा केबल नेटवर्कपुरते कधीच मर्यादित राहिलेले नाही. अत्याधुनिक केबल सेवेसोबतच 'आरआरसी ब्रॉडबँड'च्या माध्यमातून अकोल्यासह संपूर्ण परिसरातील घराघरांमध्ये सर्वात वेगवान, अखंडित आणि अत्यंत परवडणारे इंटरनेट पोहोचवण्यात ही संस्था नेहमीच आघाडीवर राहिली आहे. तसेच,'आरआरसी स्टोन अँड क्रशर' 'आरआरसी कन्स्ट्रक्शन' च्या माध्यमातून साकारलेल्या दर्जेदार आणि विश्वसनिय बांधकामामुळे परिसरातील शहरविकासाला एक आधुनिक आणि नवी दिशा लाभली आहे. बहुआयामी सेवांचा विस्तार करताना प्रत्येक क्षणी लोकहिताला आणि पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य देणे हीच आरआरसीची सर्वसमावेशक कार्यपद्धती राहिली आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा अतिशय सुयोग्य वापर, उत्कृष्ट आणि दर्जेदार मजकूर आणि सतत बदलत्या व सजग प्रेक्षकवर्गाला साजेसी नेटकी प्रस्तुती या त्रिसूत्रीवर उभे राहून आरआरसी नेटवर्क भविष्यात आपले स्थान अधिकच बळकट करेल, यात तिळमात्र शंका नाही.

मनोरंजन व माहितीच्या या अफाट विश्वात 'विश्वासार्हता' आणि 'जनसंपर्क' हीच या समूहाची खरी आणि अजरामर ताकद आहे. २५ वर्षांच्या या यशस्वी आणि अभिमानास्पद प्रवासाकडे मागे वळून पाहताना, आगामी उज्वल रौप्यमहोत्सवाच्या दिशेने अत्यंत आत्मविश्वासाने आणि झंझावाती वेगाने ही वाटचाल सुरू झाली आहे. स्थानिक माध्यम विश्वात आरआरसी नेटवर्कने उभारलेले हे विश्वासाचे आणि निडरतेचे अधिराज्य असेच पुढे अविरत आणि तेजोमय राहील !

आज होत असलेल्या रौप्य महोत्सवी सोहळ्या निमित्त सायं दैनिक 'सिटी न्यूज सुपरफास्ट' आणि 'आरआरसी न्यूज'च्या लक्षावधी निष्ठावान दर्शकांचे, आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेल्या जाहिरातदारांचे, अहोरात्र मेहनत करणाऱ्या केबल ऑपरेटर्सचे आणि समस्त हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार!

## माहितीचा लक्षवेधी कायदा

आपल्या देशात नागरिकांना उपलब्ध असलेल्या सर्वात महत्त्वाच्या म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ या कायद्याविषयीच्या जनजागृतीसाठी 28 सप्टेंबर हा दिवस "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने या लक्षवेधी कायद्याविषयी थोडक्यात माहिती... माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ हा कायदा आपल्या देशात अंमलात आल्यापासून मुलभूत मानवाधिकाराला महत्त्व प्राप्त झाले. पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु झाले. या कायद्याला आता 21 वर्ष पूर्ण झाली असून अजूनही हा कायदा विकासप्रक्रीयेत अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावशाली भुमिका बजावत आहे.

माहितीच्या अधिकाराबाबत सर्वप्रथम स्वीडन देशात १७६६ मध्ये 'फ्रीडम ऑफ प्रेस ॲक्ट' पारित करुन माहितीचा अधिकार सर्वप्रथम मान्य करण्यात आला. स्वीडननंतर अमेरिका, डेन्मार्क, फिनलँड, नॉर्वे, फ्रॉन्स, कॅनडा, स्पेन, जपान या देशांनी माहितीच्या अधिकाराचे कायदे केले. संयुक्त राष्ट्रसंघाने देखील त्यांच्या १९४८ च्या आमसभेच्या पहिल्या अधिवेशनात युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ ह्यूमन राईटसची घोषणा करुन नागरिकांना माहिती मिळवण्याचे स्वातंत्र्य हा मूलभूत मानवाधिकार असल्याचे आपल्या ठरावात संमत केले.

अधिकाराने जगभर पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु केले आहे. विविध देशात झालेल्या अशा कायद्यामुळे खुल्या शासन व्यवस्थेच्या प्रक्रियेला गती मिळत आहे. त्याचा एक भाग म्हणून २८ सप्टेंबर, २००२ मध्ये फ्रीडम ऑफ इन्फार्मेशन नेटवर्क या नावाने बल्गेरियामध्ये माहिती अधिकाराने भारलेल्या संघटना व कृतिगटांचे एक नवे कृतिशील संघटन जाळे उभारण्यात आले. तेव्हापासून जगभर माहिती अधिकाराची जागृती वाढावी, तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीतून विविध देशातील माहिती अधिकार कायद्यामुळे जगभर पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु झाले व खुल्या शासन व्यवस्थेच्या प्रक्रियेला गती मिळाली. या कायद्याच्या अंमलबजावणीतून पारदर्शकता व उत्तरदायित्वाची संस्कृती गतीमान व्हावी, यासाठी व खुल्या शासन व्यवस्थेसाठीची बांधिलकी व्यक्त करण्यासाठी २८ सप्टेंबर हा जागतिक माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.

महाराष्ट्र शासनाने देखील २० सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयानुसार २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिवस घोषित केला असून माहितीचा अधिकार कायद्याविषयी जनजागृती व्हावी म्हणून या दिवशी व्यापक प्रमाणात उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

***केंद्रीय माहिती कायदा***

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद 19 (१) (क) मध्ये भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे म्हणूनच माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मत सर्वोच्च व उच्च न्यायालय यांनी भारतातील विविध न्यायनिवाड्यात व्यक्त केले आहे. भारतात केंद्रीय माहिती अधिकार कायद्याला १५ जून, २००५ रोजी राष्ट्रपतींची मान्यता मिळाली व कायद्यातील काही तरतुदी अंशतः लागू करण्यात आल्या. तर १२ ऑक्टोबर, २००५ पासून या कायद्याची अंमलबजावणी जम्मू काश्मीर राज्य वगळता संपूर्ण भारतात सुरु झाली.

***महाराष्ट्र माहितीचा अधिकार***

केंद्रीय कायदा येण्यापूर्वीच ९ राज्यांनी माहितीचा अधिकार कायदा तसेच ३ राज्यांनी त्यासंबंधीचे विधेयके, कोड बनवण्यास सुरुवात केली होती. राजस्थानातील सामाजिक लेखापरिक्षणाच्या यशस्वी चळवळीपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रामध्ये माहितीचा अधिकार कायदा-२००२ संमत करण्यात आला. या कायद्यासंदर्भात देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर बदलत चाललेले वातावरण तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आंदोलनाच्या माध्यमातून धरलेल्या आग्रहाखातर महाराष्ट्र शासनाने तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार २००२ मध्ये कायद्यात सुधारणा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. माहिती अधिकार काही राज्यात पूर्वीपासून अंमलात होता. तथापि, माहिती अधिकाराचा कायदा पारित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.

***माहिती अधिकाराचा उद्देश***

नागरिकांना आवश्यक असलेली माहिती पुरविणे, प्रशासनात शिस्त निर्माण करुन अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीत व कार्यक्षमतेत वाढ करणे, शासन यंत्रणेतील व्यवहारात पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचाराचे समूळ निर्मूलन व्हावे, प्रशासकीय कार्यपध्दती, नियम व इतर शासकीय कामांमध्ये गैरव्यवहारात वाव राहू नये, शासकीय कार्यपध्दतीबद्दल सामान्य जनतेला सांशकता वाटू नये व त्यांची कामे विनाविलंब, सहजगत्या व्हावीत यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याची निर्मिती झाली.

***कायद्याची विशेषता***

शासनाने आतापर्यंत केलेल्या सर्व कायद्यामागे जनतेचे हीत हाच मुख्य हेतू होता. परंतु इतर सर्व कायदे व माहितीच्या अधिकाराचा कायदा यात मुख्य फरक असा आहे की, हे सर्व कायदे जनतेने पाळावे या अपेक्षेसह शासकीय अधिकाऱ्यांकडून त्यावर देखरेख होत होती. या भुमिकेमुळे जनता दुय्यम ठरत होती. परंतु माहितीचा अधिकार या कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकाला संसद सदस्याच्या बरोबरीची माहिती प्राप्त करण्याचा अधिकार मिळाला आहे. प्रशासकीय अधिकारी, सार्वजनिक प्राधिकरण, शासकीय कर्मचारी आपले काम प्रामाणिकपणे करतात की नाही हे सर्वसामान्य व्यक्ती पाहू शकणार आहे तर जनतेच्या अपेक्षेला शासकीय अधिकारी पुरे पडतात का याचीही तपासणी शासनाला करता येणार आहे. एखादी व्यक्ती जी माहिती मागेल त्याला ती माहिती ठराविक कालावधीत देण्याचे या कायद्यानुसार सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधन असल्यामुळे शासकीय कारभार आपोआपच अधिकाधिक पारदर्शक बनत जाईल. त्यामुळे भ्रष्टाचार आपोआप कमी होऊन राज्यकारभार जनताभिमूख होईल, हेच या कायद्याचे सामर्थ्य आहे.

***कायद्यातील तरतुदी***

कोणत्याही भारतीय नागरिकाला माहिती मागण्याचा अधिकार आहे. माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे, हे उघड करणे बंधनकारक नाही. माहिती मागण्यासाठी साधा अर्ज आणि दहा रुपये शुल्क, जीवित स्वातंत्र्य या संदर्भातील माहिती ४८ तासात देणे बंधनकारक आहे. सर्वसाधारण माहिती देणे अथवा नाकारणे यासाठी सर्वसाधारणपणे ३० दिवसाची मुदत, सहायक माहिती अधिकाऱ्यांकडे दाखल झालेल्या अर्जासाठी ३५ दिवस तर त्रयस्थ व्यक्तींचा संबंध येत असल्यास माहिती पुरवण्यासाठी ४० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास अथवा मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यास प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे ३० दिवसात अपिल करता येईल. तेथूनही समाधान न झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे ९० दिवसांच्या आत दुसरे अपील करता येते. विवक्षित गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना, मानवी हक्कांचे उल्लंघन इत्यादींशी संबंधित माहिती देता येणार नाही. जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हा किंवा तालुकास्तरावर कोणतेही वेगळे कार्यालय नाही. शासनाने प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी पदनिर्देशित केले आहेत. आपल्याला ज्या कार्यालयाशी संबंधित माहिती हवी आहे त्या प्रत्येक कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावा. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हा संबंधित कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाचा अधिकारी असतो. द्वितीय अपिल दाखल करण्यासाठी शासनाने बृहन्मुंबई, कोकण, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती आणि मुंबई या सर्व विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी आयोगाचे खंडपीठ स्थापन केले आहेत. माहिती आयुक्तांचा निर्णय हा दुसऱ्या अपिलानंतरचा अंतिम निर्णय राहील. या निर्णयाविरुध्द कोणत्याही कोर्टात दावा किंवा खटला दाखल करता येत नाही.

माहितीच्या अधिकाराविषयीचा अर्ज दाखल करताना हव्या असलेल्या माहितीचे वर्णन योग्य रितीने मांडले जाणे अतिशय महत्वाचे आहे. प्रश्नार्थक स्वरुपाची, कारणे विचारणारी माहिती, मुद्दा नसलेले किंवा गैरसमज उत्पन्न करणारे अर्ज फेटाळण्याची शक्यता अधिक असते. एका अर्जात एका विषयाशी संबंधितच माहिती विचारावी. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना ५० पृष्ठापर्यंतची माहिती मोफत देता येते. महाराष्ट्र शासनाने ई-गव्हर्नंन्सला नेहमीच महत्व दिले आहे. इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्ती व नागरिकांकडून आलेले अर्ज स्विकारण्यासाठी व संबंधित माहिती देण्यासाठी शासनाने www.rtionline.maharashtra.gov.in या नावाचे पोर्टल सुरु केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कायदा अंमलात आल्यापासून त्याचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढतच असून या कायद्याचा प्रचार व प्रसार यातून नागरिकांना त्यांच्या हक्काची जाणीव होत आहे. कायद्याचा वापर करण्यात महाराष्ट्र देशात अव्वल आहे. अधिकाधिक लोकांनी या कायद्याचा वापर करावा हा शासनाचा उद्देश सफल होत असल्याचे दिसून येते. देशातील अनेक घोटाळे उघडकीस आणण्यामागचा शिल्पकार माहिती अधिकार कायदा आहे. सामाजिक परिवर्तनासाठी माहितीचा अधिकार म्हणजे एक शस्त्र आहे. याचा योग्य वापर व्हावा, ही अपेक्षा.

**अनिल आलुरकर,**
उपसंचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

# मशिदीसमोर गणेश मंडळांचे स्वागत; मुर्तिजापुरात हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**मुर्तीजापुर :** तालुका प्रतिनिधी गणेश विसर्जन मिरवणुकीत मशिदीसमोरून जाणाऱ्या गणेश मंडळांचे मुस्लिम बांधवांनी उत्साहात स्वागत करीत हिंदू-मुस्लिम ऐक्य, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा सुंदर संदेश दिला. शहरातील जामा मशिद तसेच स्टेशन परिसरातील मशिदीसमोर हा उपक्रम पार पडला. धार्मिक श्रद्धा वेगवेगळ्या असल्या तरी माणुसकीची भावना एकच असल्याचा प्रत्यय या प्रसंगी आला.

मुस्लिम बांधवांनी न्यू गणेश मंडळाचे अध्यक्ष अंकित अग्रवाल तसेच श्री तेज हनुमान गणेश मंडळाचे अध्यक्ष व नगरपरिषद उपाध्यक्ष रोहित अव्वलवार यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मंडळांचे मार्गदर्शक लायन्स क्लबचे अध्यक्ष सतीश अग्रवाल, माजी नगरसेवक अशोक अवलवार, मधुअण्णा अव्वलवार, गणेशअण्णा अव्वलवार, हर्षल दादा मित्रपरिवार, माजी नगराध्यक्ष पवन अव्वलवार, सामाजिक कार्यकर्ते निलेश वानखडे, सतीश शेगावकर, धनंजय कुलकर्णी यांचाही मस्जिदीसमोर सत्कार करण्यात आला.

हा सत्कार सामाजिक कार्यकर्ते शेख इमरान शेख खलील, मन्सूर राही आणि आरिफ ठेकेदार अनवर पठान यांच्या वतीने करण्यात आला.





## जुनी वस्ती परिसरात गणेश विसर्जन शांततेत

मुर्तीजापुरातील जुनी वस्ती परिसरातही गणेश विसर्जन शांततेत पार पडले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, आमदार हरीश पिंपळे, नगराध्यक्ष हर्षल साबळे, ज्येष्ठ माजी नगरसेवक विनायक गुल्हाने, उपविभागीय अधिकारी संदीपकुमार आपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, नगरपरिषद मुख्याधिकारी निलेश जाधव, मौलाना जफर खतीब, संजय गुप्ता, कैलास महाजन, मा.नगरसेवक इब्राहिमभाई घाणीवाला, नगरसेवक निजाम ललकार, नगरसेवक राहुल गुल्हाने, रफिक कुरेशी, नगरसेवक अब्दुल बाकी, सद्दाम पटेल, अब्दुल कुद्दूस, रशीद चाऊस, जुनेद खतीब अजहर शेख यांच्यासह हिंदू-मुस्लिम बांधव सहभागी झाले. स्टेशन परिसरातील हर्षल दादा मित्र परिवाराच्या वतीनेही सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला. उज्वल अग्रवाल, अनुप अग्रवाल, अंकुश अग्रवाल, अश्विन पचेरीवाल, उज्वल ठाकरे यांच्यासह विविध समाजातील नागरिकांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अन्वर खान यांनी केले.

'गर्व से कहो, हम सब एक हैं' या भावनेतून हिंदू-मुस्लिम बांधवांनी सामाजिक एकोप्याचे दर्शन घडविले. "एकमेकांच्या उत्सवात सहभागी होऊन आनंद वाटून घेतला, तर सामाजिक सलोखा अधिक दृढ होतो. ही एकता आणि अखंडता कायम टिकावी, यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा," अशी भावना सामाजिक कार्यकर्ते सतीश अग्रवाल यांनी व्यक्त केली.

पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. उपविभागीय अधिकारी वैशाली मुळे यांच्या उपस्थितीत शहर ठाणेदार धर्मेश जोशी, तर ग्रामीण भागात ठाणेदार दीपक महाडिक यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी बंदोबस्त ठेवला.

# तेल्हारा परिसरात पावसाची आतुरता
## आकाशात ढगांची गर्दी, मात्र तालुका कोरडाच

परमेश्वर इंगळे २६ सप्टेंबर



**तेल्हारा :** महाराष्ट्रात सप्टेंबर २०२६ च्या उत्तरार्धात काही भागात परतीच्या पावसाने आणि वादळी पावसाने हजेरी लावली असली, तरी बऱ्याच भागांत पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

तेल्हारा परिसरात रोज ढगांची येजा सुरू आहे परंतु पाऊस पडत नसल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. दररोज आभाळ येते आणि लगेच निघून जाते जसं आभाळ निघून जाते तशीच शेतकरी शेतमजूर यांच्या पण आशेची निराशा होते. सद्यस्थितीत बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं चक्रीवादळ विशाखापट्टणम कडुन पुढे सरकुन नागपूर जवळुन प्रयागराज कडे जात आहे त्याचाच परिणाम म्हणून तेल्हारा परिसरात दोन दिवसांपासून हवेच्या वेगात वाढ बघायला मिळत आहे.

तेल्हारा तालुक्यातील सोयाबीन पिकाचे उत्पादन पावसाने वेळेवर पाठ फिरवल्याने निश्चितच कमी बघायला मिळणार आहे त्यातच काही शेतकरी वर्गाने आपल्या सोयाबीन पिकावर ट्रॅक्टर चालवून पुढील पिकासाठी शेत मोकळे केलं.जर आगामी दिवसांत परतीचा पाऊस दमदार राहीला तर एकमेव तुर पिकावर शेतकरी वर्ग आस ठेवून आहे कारण तेल्हारा तालुक्यात तुर पिकाचा पेरा बर्यापैकी आहे. सद्यस्थितीत तरी तेल्हारा परिसरात समाधानकारक पाऊस झाला नसल्याने काही पिके हातुन गेल्याने शेतकरी आणि शेतमजुरी नसल्याने शेतमजूर वर्ग आर्थिक संकटाखाली दाबला गेला आहे.

## गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलाव सज्ज

वि. प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अकोट :** गणेशोत्सवानिमित्त गणेशमूर्ती विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावे आणि नदी, नाले, तलाव यांसारख्या नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण टळावे, यासाठी अकोट नगरपरिषदेच्या वतीने कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली आहे. पोपटखेड मार्गावरील ग्रामीण रुग्णालयाच्या मागील नगरपरिषदेच्या भूखंडावर हा कृत्रिम तलाव तयार करण्यात आला आहे. गणेशमूर्तींचे नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन केल्यास जलप्रदूषण होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांनी गणेशमूर्तींचे विसर्जन नदी, नाले किंवा तलावांमध्ये न करता नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम तलावात करावे, असे आवाहन केले आहे.

# अमरावती शिक्षक मतदारसंघासाठी आज नाव नोंदणीची अंतिम मुदत
## ऑनलाइन अर्ज रात्री १२ वाजेपर्यंत

**अमरावती :** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी पात्र शिक्षकांसाठी आज नावनोंदणीची अंतिम मुदत आहे. कार्यालयीन प्रक्रियेसाठी आज कार्यालयीन वेळेपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार असून, ऑनलाइन नावनोंदणीची मुदत रात्री १२ वाजेपर्यंत असल्याची माहिती जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

अमरावती विभागातील पात्र शिक्षकांनी मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी अंतिम संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नावनोंदणी न झाल्यास आगामी शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे पात्र शिक्षकांनी कोणतीही दिरंगाई न करता कार्यालयीन प्रक्रियेसाठी आज कार्यालयीन वेळेत, तर ऑनलाइन अर्जासाठी रात्री १२ वाजण्यापूर्वी नावनोंदणी पूर्ण करावी, असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे. आज अंतिम मुदत; ऑनलाइन नावनोंदणीसाठी रात्री १२ वाजेपर्यंत संधी.

# श्री नवनिर्मित गणेशोत्सव मंडळाच्या वतीने महिला आरोग्य शिबिराला प्रतिसाद



प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**आडगाव :** बु. श्री नवनिर्मित गणेशोत्सव मंडळ, बाजारपुरा आडगाव बु. च्या वतीने गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर सामाजिक बांधिलकी जपत आज दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी गणपती मंडळासमोर भव्य महिला आरोग्य विषयक मार्गदर्शन व मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

महिलांचे आरोग्य हेच कुटुंबाचे आरोग्य या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. वैष्णवी बेंदरकर यांनी उपस्थित राहून महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आडगाव बु. च्या माजी सरपंच सौ. शोभाताई खंडारे, सामाजिक कार्यकर्त्या शालिनीताई देशमुख, डॉ. स्नेहल कोल्हे, माजी जिल्हा परिषद सदस्या प्रमोदिनीताई कोल्हे, सौ. द्वारकाबाई अवचार आदी मान्यवर उपस्थित होत्या.

डॉ. वैष्णवी बेंदरकर यांनी यावेळी महिलांचे आरोग्य, गर्भधारणा व प्रसूती काळात घ्यावयाची काळजी, संतुलित आहार, कौटुंबिक नियोजनाचे महत्व, स्त्रीरोगांची लक्षणे व त्यावरील उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच उपस्थित महिलांची तपासणी करून आवश्यक रोगनिदान व औषधोपचाराबाबत सल्ला देण्यात आला. अनेक महिलांनी आपल्या आरोग्यविषयक शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन डॉ. स्नेहल कोल्हे यांनी केले. तसेच त्यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

# हिवरखेड बसस्थानक, सोनवाडी फाटा व मेन रोड परिसरात चिडीमारांचा हैदोस

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**हिवरखेड :** बस स्थानक परिसर, सोनवाडी फाटा आणि हिवरखेड मेन रोड परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून टवाळखोरांचा हैदोस सुरू आहे. यामुळे विशेषतः शाळा-कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनेक विद्यार्थिनी भीतीपोटी तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. या टवाळखोरांकडून मोबाईलद्वारे त्रास देणे, कोचिंग क्लासेसच्या परिसरात घुटमळणे आणि येण्या-जाणाऱ्या मुलींची छेड काढण्याचे प्रकार वाढले आहेत. यातील एक धक्कादायक प्रकार एका खासगी कोचिंग क्लासेस परिसरातही



घडल्याची चर्चा आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी अशाच एका प्रकाराला कंटाळून स्थानिक तरुणांनी एकजूट दाखवत एका टवाळखोराला चांगला चोप दिल्याची घटना घडली होती. त्यावेळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली होती. परंतु, या घटनेनंतरही या परिसरात अशा टवाळखोरांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. यामुळे पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिस गस्त वाढवण्याची मागणी आहे.

# लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठात गणेशोत्सव उत्साहात

वि. प्रतिनिधी २६ सप्टेंबर



**अकोट :** शहरातील लाल बहादूर शास्त्री ज्ञानपीठ येथे यंदाचा गणेशोत्सव मोठ्या भक्तिभाव आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दि. १४ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर श्री गणेशाची विधिवत स्थापना करण्यात आली. बाप्पाच्या आगमनानिमित्त संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला होता.

गणेश स्थापनेच्या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, उपाध्यक्ष लूणकरण डागा, सचिव प्रमोद चांदक, रेखा चांदक, शारदा लखोटिया, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, प्राचार्य रामेश्वर पातोंड, बचपन प्ले स्कूलच्या मुख्याध्यापिका कोमल मनी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रभारी निलिमा देशमुख तसेच विशाल चांदूरकर यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.गणेशोत्सव काळात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. दि. १५ सप्टेंबर रोजी इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी 'धान्यापासून गणपती सजावट' स्पर्धा, १६ सप्टेंबर रोजी इयत्ता तिसरी व चौथीसाठी 'गणेश रंगभरण' स्पर्धा, १७ सप्टेंबर रोजी 'सेल्फी विथ बाप्पा' उपक्रम, १९ सप्टेंबर रोजी इयत्ता सहावीसाठी 'सुंदर दिवा डेकोरेशन' स्पर्धा तर २२ सप्टेंबर रोजी इयत्ता सातवीसाठी 'रांगोळी व क्राफ्ट', आठवीसाठी 'गणपती पोस्टर' आणि नववीसाठी 'प्रश्नमंजुषा' स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकता, कलात्मकता आणि सर्जनशीलतेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पर्धांच्या आयोजनासाठी प्रथमेश ठाकरे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# निंबा फाटा येथे सीसीटीव्ही कॅमेरे बंद



प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**हातरुण :** बाळापुर तालुक्यातील निंबा फाटा येथील कॅमेरे बरेच वर्षांपासून बंद असल्याचे व्यापा-यांनी निदर्शनास आणून दिले. परंतु काही उपयोग झाला नाही. परिसरात दिवसेंदिवस चोरीचे प्रमाण वाढत आहे. पाच सहा दिवसापूर्वी निंबा फाट्यावरील किराणा दुकानात चोरी झाली होती. कॅमेरे सुरू असते तर चोरांची हिम्मत वाढली नसती असे बोलले जात आहे.

वाढत्या घटनांमुळे व्यापारी वर्गात दहशत पसरली आहे. तसेच या भागातील अवैध धंद्यांना वेसण घालण्यासाठी रात्रीला गस्त वाढवण्याची गरज आहे. या विषयी उरळ पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांशी संवाद साधला असता बंद पडलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा संबधी वरिष्ठ विभागाशी पत्रव्यवहार केला. काही दिवसातच कॅमेरे चालु होतील असे सांगण्यात आले.

# बाळापुर शहरात गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**बाळापुर :** जुने शहरातील श्री बारभाई गणेश मंडळाच्या मानाच्या गणपतीचे आमदार नितीन बापू देशमुख यांनी पूजन व आरती करून मिरवणुकीला सुरुवात झाली. शांतता समितीचे अध्यक्ष ब्रिजमोहन मंदरेले, गणेश विसर्जन मिरवणुकीचे उपाध्यक्ष दीपक सगळेकर, लहुजी वस्ताद मंडळाचे अध्यक्ष यांनी व शांतता समितीचे सदस्य माजी अध्यक्ष गजानन महाराज पुरी यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थिती मध्ये मिरवणुकीला सुरुवात झाली.



मुख्य बाजार चौकात श्री गणेश पूजन करून मिरवणुकीला प्रारंभ झाला. मिरवणुकीमध्ये श्री गुरुदेव हनुमान गणेशोत्सव मंडळ कासारखेड, श्री महावीर गणेशोत्सव मंडळ शिवाजीनगर, श्री महात्मा ज्योतिबा फुले गणेशोत्सव मंडळ कासारखेड, श्री सिद्धिविनायक गणेशोत्सव मंडळ अकोला नाका बाळापुर, श्री गुरुकृपा गणेशोत्सव मंडळ रंगारहाटी, श्री मानकेश्वर गणेशोत्सव मंडळ डांगेपुरा, दि ग्रेट मराठा गणेशोत्सव मंडळ महादेव मंदिर पंचमळी अकोली वेस्ट, श्री क्रांतिवीर लहुजी वस्ताद गणेशोत्सव मंडळ अण्णाभाऊ साठे नगर, श्री जय बजरंग गणेश उत्सव मंडळ माळीपुरा, श्री जय हिंद गणेशोत्सव मंडळ नारायणपुरा, श्री. नवयुवक गणेशोत्सव मंडळ गुजरातीपुरा, श्री बालाजी गणेशोत्सव मंडळ जुनी चावडी, श्री सार्वजनिक गोणी सात गणेश उत्सव मंडळ तेलीपुरा कन्या शाळा, श्री लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळ वाकडे चौक, गजानन महाराज मंदिर पंचमळी बाळापूर या मंडळांनी श्री गणेश विसर्जन शांतता मिरवणुकीत सहभाग घेतला.

श्री गुरुकृपा गणेशोत्सव मंडळ रंगहट्टी यांनी अन्नपदार्थ मधील भेसळ व त्याविरुद्ध महाराष्ट्रभर होत असलेल्या थेट कारवाईचे पथनाट्य सादर केले. जनजागृती करून भेसळविरोधी अभियानाचा संदेश दिला. श्री नारायणपुरा येथील मंडळाने भालू नाट्य सादर केले. सर्व मंडळांनी आपापले वाद्य परंपरागत घड्याळ बँड ढोल ताशेचा वापर केला. मिरवणूक शांततेने व उत्साही वातावरणात पार पडली. मिरवणुकीचा शेवट मुख्य बाजार चौकात शांतता समितीचे अध्यक्ष ब्रिजमोहन मंदरेले, दीपक सगळेकर, गजानन महाराज पुरी, उमेश आप्पाजी भुसारी, ठाणेदार प्रकाश झोडगे, सामाजिक कार्यकर्ते शामराव भाऊ शेलार यांच्यासह मान्यवरांनी समस्त गणेश भक्ताचे व मंडळातील अध्यक्ष सदस्यांचे आभार मानले. त्याचबरोबर प्रशासनातील सर्व घटकांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे सुद्धा आभार मानले. शहरातील किल्लेकर परिवार आणि वाल्मिकी समाजाकडून प्रसाद वितरण झाले.

मिरवणुकीचा शेवट गणेश घाटावर शांततेने झाला. पुढच्या वर्षी लवकर या म्हणत बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

# सर्वोपचार रुग्णालयात फळे व बिस्किटांचे वाटप!
## पदाधिकारी व समाजबांधवांची उपस्थिती




**अकोला :** सामाजिक एकजूट, समाजजागृती आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्यावतीने वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यावेळी जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात जाऊन गरजू रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांना फळे व बिस्किटांचे वाटप केले.

समाजातील विविध घटकांना एका व्यासपीठावर आणून त्यांच्यामध्ये सामाजिक एकोपा निर्माण करण्याच्या उद्देशाने या संघटनेची स्थापना करण्यात आली होती. समाजाच्या प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडणे आणि गरजू समाजबांधवांच्या मदतीसाठी पुढाकार घेणे, या उद्देशाने संघटनेची वाटचाल सुरू आहे. रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या तसेच आपल्या नातेवाईकांसोबत आलेल्या गरजू व्यक्तींना या उपक्रमाचा लाभ मिळाला. समाजसेवा हीच खरी सामाजिक बांधिलकी या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# दुग्धव्यवसाय प्रशिक्षण शिबिरास पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

वि. प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अकोट :** अकोट तालुक्यातील जैनपूर पिंप्री येथे विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पांतर्गत आयोजित एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षण शिबिरास पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेतीला पूरक व शाश्वत उत्पन्नाचा स्रोत म्हणून दुग्धव्यवसाय अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात आधुनिक तंत्रज्ञान, पशुपालन व्यवस्थापन आणि विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अकोला जिल्ह्याचे उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) डॉ. संजय कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त सहायक आयुक्त डॉ. संजय रंधे होते.

प्रमुख वक्ते डॉ. गजेंद्र अंबलकर यांनी संतुलित आहार, हिरवा व कोरडा चारा व्यवस्थापन, कडबा कटर मशिनचे महत्त्व तसेच दुग्धव्यवसायात महिलांच्या सहभागाची गरज यावर मार्गदर्शन केले. डॉ. मंगेश दांदळे यांनी शास्त्रशुद्ध दूध काढणी, क्लीन मिल्क प्रॉडक्शन आणि स्तनदाह व्यवस्थापन या विषयांवर माहिती दिली.

जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. स्वप्नील कुकडे यांनी दुग्धउत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान, किसान क्रेडिट कार्ड योजना आणि पशुधन विमा योजनेची माहिती देत प्रकल्पांतर्गत कडबा कटर मशिनवर ५० टक्के शासकीय अनुदान उपलब्ध असल्याचे सांगितले. इच्छुक पशुपालकांनी www.vmddp.com या संकेतस्थळावर अर्ज करण्याचे आवाहन त्यांनी केले.

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर गावंडे यांनी डेअरीमार्फत राबविण्यात येणाऱ्या बायोगॅस, मधुमाशी पालन, मुरघास व फर्टिलिटी फीड योजनांची माहिती दिली. शिबिरानंतर उपस्थितांना शासकीय प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी अकोला जिल्हा क्षेत्र अधिकारी योगेश राठोड, व्यवस्थापक सुरेंद्र मंगळे, आकाश जाधव, सागर इटखेडे तसेच दूध संकलन सहाय्यक अनंता भगत उपस्थित

# सामाजिक कार्यकर्ते प्रकाश बोनगिरे यांची निर्दोष मुक्तता

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** शहराच्या मोरारजी चौकातील नाल्याच्या बांधकाम प्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने प्रकाश बोनगिरे यांची निर्दोष मुक्तता केली.

नगर पालिकेचे अभियंता संकेत तालकोकूलवार यांनी दिनांक २१ जानेवारी २०२२ ला दिलेल्या फिर्यादीनुसार ते कंत्राटदारास रस्त्याचे रस्त्याचे ले आऊट समजाऊन सांगत असतांना येथील सामाजिक कार्यकर्ते प्रकाश बोनगीरे यांनी शासकीय कामात अडथळा निर्माण करून धमकी दिल्याचा आरोप केला होता. या फिर्यादीवरून ६५ वर्षीय प्रकाश बोनगिरे यांना अटक करण्यात आली होती व त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली होती. अकोल्याच्या जिल्हा व सत्र न्यायालयातील जिल्हा विशेष न्यायाधीश तेजवंतसिंग संधू यांच्या कोर्टात याप्रकरणी सुनावणी होऊन प्रकाश बोनगिरे यांची निर्दोष मुक्तता केली. मूर्तिजापूरचे ॲड.सचिन वानखडे, अमरावतीचे ॲड शिरीष ढवळे व येथील ॲड.एम.एम हुसेन यांनी प्रकाश बोनगिरे यांची बाजू प्रभावीपणे मांडली. मिलींद गवई यांनी या प्रकरणी सहकार्य केले.

# तलावातील गाळात फसून बैलाचा मृत्यू

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**तेल्हारा :** तेल्हारा तालुक्यातील आकोली रूपराव येथील एका शेतकऱ्याचा बैल संध्याकाळी घरी येतांना तलावात पाणी पिण्यासाठी गेला असता गाळात फसून बैलाचा मृत्यू झाल्याची घटना 24 ला संध्याकाळी 6 वाजता दिसून आली.

आकोली रूपराव येथील शेतकरी भगवान तुळशीराम तायडे यांचा बैल संध्याकाळी 6 वाजता चरून घरी परत येत असताना रस्त्यालगत असलेल्या तलावात पाणी पिण्यासाठी गेला असता तलावात असलेल्या गाळात बैल फसून बैलाचा मृत्यू झाल्याची बाब शेतकऱ्यांच्या निर्दशनास आली त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. ऐन दुष्काळात शेतकऱ्याचे नुकसान झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# ट्रॅव्हल्सच्या धडकेत तरुण जागीच ठार

## सणासाठी आला होता घरी; एकुलत्या तरुणावर काळाचा घाला

प्रतिनिधी २६ सप्टेंबर



**यवतमाळ :** दारव्हा - यवतमाळ महामार्गावरील जामवाडी बसस्टॉपजवळ आज शुक्रवारी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास एका भरधाव ट्रॅव्हल्सने दुचाकीला भीषण धडक दिली. या भीषण अपगात दुचाकीस्वार तरुण जागीच ठार झाला.

ऋषिकेश दिलीप हेडाऊ (वय २०, रा. जवळगाव, ता. नेर) असे मृत युवकाचे नाव आहे. ऋषिकेश हा पुणे येथील एका खासगी कंपनीत कामाला होता.

आगामी सण-उत्सवाच्या निमित्ताने तो आपल्या मूळ गावी जवळगाव येथे आला होता. शुक्रवारी दुपारी तो आपल्या एमएच २९ एएस २३४७ दुचाकीने यवतमाळहून गावाकडे जात होता. जामवाडी बसस्टॉपजवळ भरधाव येणाऱ्या श्यामबाबा ट्रॅव्हल्स क्रमांक एमएच २९ बी ७९०९ ने त्याच्या दुचाकीला धडक दिली. ही धडक एवढी भीषण होती की, ऋषिकेशचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

### कुटुंबाचा आधार हिरावला

■ मृत ऋषिकेश हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याला एक लहान बहीण असून संपूर्ण कुटुंबाचा आर्थिक भार त्याच्यावरच होता. सणासाठी घरी आलेल्या तरुण मुलाचा असा अचानक अपघाती मृत्यू झाल्याने हेडाऊ कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संपूर्ण जवळगाव परिसरात शोककळा पसरली.

### ट्रॅव्हल्स जप्त; चालकाविरुद्ध गुन्हा

■ या घटनेची माहिती मिळताच लाडखेड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघातग्रस्त ट्रॅव्हल्स ताब्यात घेतली असून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार विनायक लंबे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार विनोद पवार व सुनील राठोड पुढील तपास करीत आहे.

# यूपीआय व्यवहारांवर टॅक्स?

## व्यापारी व ग्राहकांमध्ये संभ्रम; व्यापाऱ्यांकडून रोख पैशाचा आग्रह

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**दिग्रस :** "यूपीआय व्यवहारांवर आता अतिरिक्त टॅक्स लागणार", अशा पसरलेल्या अफवेमुळे दिग्रससह परिसरातील बाजारपेठेत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. या अफवेचा फटका थेट दैनंदिन व्यवहारांना बसत असून, व्यापाऱ्यांकडून डिजिटल पेमेंट नाकारून रोख रकमेची मागणी केली जात आहे. केंद्र सरकारने असा कोणताही टॅक्स लावला नसल्याचे स्पष्ट केले असतानाही, अफवेपोटी ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे.

गेल्या काही वर्षांत किराणा, भाजीपाला, औषधी दुकान आणि हॉटेलमध्ये यूपीआय पेमेंटची सवय झालेल्या नागरिकांकडे सध्या पुरेशी रोख रक्कम नसते. अशा वेळी दुकानदारांनी थेट क्यूआर कोड बंद करून रोख रकमेचा आग्रह धरल्याने ग्राहकांना अचानक एटीएम शोधण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यातच बाजारपेठेत ५, १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटांचा मोठा तुटवडा जाणवत आहे. ५०० रुपयांची नोट दिल्यास सुटे पैसे परत देताना व्यापाऱ्यांचीही कोंडी होत असून, परिणामी ग्राहकांना खरेदी अर्धवट सोडून परतावे लागत आहे.

यूपीआय व्यवहारांमुळे 'सुटे पैसे नाहीत' ही समस्या सुटली होती. मात्र, केवळ अफवेवर विश्वास ठेवून रोख व्यवहारांचा आग्रह धरल्याने बाजारपेठेचे चक्र अडखळले आहे.

### अफवांवर विश्वास ठेवू नका

■ केंद्र सरकारने यूपीआय व्यवहारांवर असा कोणताही सरसकट टॅक्स लागू केलेला नाही. अप्रमाणित व्हॉट्सअॅप मेसेजमुळे व्यापारी आणि ग्राहक दोघेही अडचणीत येत आहेत. अफवा टाळून डिजिटल व्यवहारांचा वापर सुरळीत ठेवावा.

सोशल मीडियावर फिरणाऱ्या चुकीच्या माहितीवर नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.

# आर्णीतील मुबारक नगरमध्ये पाणीटंचाई

## हापसीवर मोटारपंप बसवण्याची मागणी

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**आर्णी :** येथील प्रभाग क्रमांक २, मुबारक नगर परिसरातील रिजवान टेलर यांच्या घरासमोरील हापसीवर तातडीने विद्युत मोटारपंप बसवावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या या हापसीला मोटारपंप नसल्यामुळे रहिवाशांना हातपंपाने पाणी उपसावे लागत आहे. यामुळे विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि



लहान मुलांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असून परिसर पालथा घालावा लागत आहे. याबाबत नागरिकांनी मुख्याधिकारी, नगर परिषद आर्णी यांना निवेदन दिले आहे. येथे मोटारपंप बसविल्यास नागरिकांची गैरसोय दूर होऊन मुबलक पाणी उपलब्ध होईल, असे निवेदनात नमूद केले आहे.

■ "हापसीला मोटार नसल्याने पाणी काढताना मोठा त्रास सहन करावा लागतो. महिला व ज्येष्ठांना पाण्यासाठी दूर जावे लागते. नगर परिषद प्रशासनाने ही अडचण लक्षात घेऊन तातडीने मोटारपंप बसवावा."
- रिजवान भाई टेलर
(स्थानिक नागरिक, प्रभाग २, आर्णी)

# 'तिकीट'ला बगल; एसटीच्या महसुलाला फटका

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**झरी-जामणी :** वणी एसटी बस आगारातून धावणाऱ्या एसटी गाड्यांमध्ये प्रवाशांकडून पूर्ण भाडे वसूल करूनही तिकीट न देणे अथवा कमी रकमेचे तिकीट देणे, असा गैरप्रकार सर्रास सुरू आहे. यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत असून प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रतिमेलाही धक्का बसत आहे.

या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी भरारी पथके पुन्हा सक्रिय करून अचानक तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी समाजसेवक वासुदेव विधाते, रफीक कनोजे यांनी यवतमाळच्या विभाग नियंत्रकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पूर्वी महामंडळाची भरारी पथके अचानक बसची तपासणी करत असल्याने अशा गैरप्रकारांवर प्रभावी



नियंत्रण राहत होते. मात्र, सध्या तपासणी मोहिमा थंडावल्यामुळे गैरप्रकारांना मोकळे रान मिळाले आहे. महामंडळाचा प्रत्येक रुपया हा सार्वजनिक महसूल असल्याने तक्रारींची निष्पक्ष चौकशी, अचानक तपासण्या आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे झाले आहे.

डिजिटल प्रणाली व ई-तिकीट: ईटीआयएम व डिजिटल तिकीट प्रणाली अधिक प्रभावी करून मुख्य सर्व्हरशी जोडावी तसेच डिजिटल व्यवहारांसाठी युपीआय भाडेव्यवस्था सुरू करावी. प्रत्येक आगारात ध्वनिक्षेपकाद्वारे प्रवाशांना 'तिकीट आवर्जून घ्या' असे आवाहन करावे. बसमध्ये अधिकृत व्हॉट्सअॅप क्रमांक, टोल-फ्री हेल्पलाईन व ई-मेल ठळकपणे प्रदर्शित करावा. चालक व वाहकांसाठी निर्धारित गणवेश आणि नाव-बक्कल क्रमांकाची नेमप्लेट बंधनकारक करावी.

विनातिकीट प्रवाशांवर दंडात्मक कारवाई व्हावी आणि तक्रारदार प्रवाशांची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवावी. वणी आगारातील बसची अचानक तपासणी मोहीम राबवून त्याचा अहवाल सार्वजनिक करावा आणि प्रशासनाने यावर तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी समाजसेवक विधाते व कनोजे यांनी केली आहे.

# कोरडा दुष्काळ जाहीर करा; तहसील कार्यालयावर काँग्रेसचा मोर्चा

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**बाभुळगाव :** पावसाच्या अवकृपेमुळे बाभुळगाव तालुका भीषण संकटात सापडला असून पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे बाभुळगाव तालुका तातडीने 'कोरडा दुष्काळग्रस्त' घोषित करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान त्वरित मंजूर करावे, या मागणीसाठी बाभुळगाव तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी (२४ सप्टेंबर) तहसील कार्यालयासमोर आक्रमक धरणे आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंत पुरके यांच्या नेतृत्वात आणि जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सचिन नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत हे आंदोलन पार पडले. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दुमदुमवून सोडला. त्यानंतर तहसीलदारांना




मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. शासनाने त्वरित दुष्काळ जाहीर करून मदत न दिल्यास काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा सज्जड इशारा या वेळी नेत्यांनी दिला.

बाभुळगाव तालुका तातडीने कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करण्यात यावा. बाधित शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान त्वरित जाहीर करावे. या वर्षाचा पीकविमा तातडीने मंजूर करून विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी. रब्बी हंगामातील बी-बियाणे व खते अनुदानावर उपलब्ध करून द्यावीत. मागील वर्षाचा रखडलेला पीकविमा मंजूर करून नुकसानभरपाई देण्यात यावी.

या आंदोलनात ज्येष्ठ नेते कृष्णा कडू, खरेदी-विक्री संघांचे अध्यक्ष श्रीकांत कापसे, जिल्हा सरचिटणीस प्रकाश नागतोडे, तालुका अध्यक्ष राजेश काटेकर, युवक तालुका अध्यक्ष अमेय घोडे, पंचायत समितीचे माजी उपसभापती अतुल देशमुख, माजी उपसभापती अतुल राऊत, नगरपंचायत उपाध्यक्ष श्याम जगताप, बाजार समिती सभापती दिनेश गुल्हाने, उपसभापती डॉ. रमेश महानुर, संचालक अमोल कापसे, प्रज्वल राऊत, प्रवीण वाईकर, जिल्हा किसान काँग्रेसचे अध्यक्ष मनमोहन भोयर, ज्येष्ठ नेते यादवराव घुरडे, प्रकाश छाजेड, पांडुरंग लांडगे, शेख कादर, मुकेश देशमुख, मोहन बनकर, अशोकराव गावंडे, अजय गावंडे, शैलेश गुल्हाने, माजी उपसभापती रमेश लोखंडे, सिद्धेश्वर चौधरी, हबीब बेग, कृष्णा ठाकरे, सुनील मते, विलास मेश्राम, सुभोध नगराळे, विनोद वाटमोडे, विपुल बोदडे, अक्षय राऊत, प्रदीप नंदुरकर, अंकुश सोयाम, दिलीप मडावी, दिलीप भाकरे, सुधाकर दातार, भास्कर मुदणकर, राजआनंद बनसोड, मोहम्मद शरीफ, पुरुषोत्तम चौधरी, वाल्मिक वासेकर, सुनील अजबळे, शाहरुख खान, समाधान डफळे, संतोष इंगळे, निखिल गाडगे, सद्दाम पठाण, प्रभाकर जुनघरे, गोविंद माटे, राहुल घोडेस्वार, सुयोग आराडे, गणवीर, प्रवीण सपकाळ यांच्यासह विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरणच्या भरारी पथकाची तपासणी मोहीम

## नियमित वीज पुरवठा व समान कारवाईची गावकऱ्यांची मागणी

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**कळंब :** महावितरण कंपनीच्या विशेष भरारी पथकाद्वारे डोंगरखर्डा व लगतच्या परिसरात २२, २३ सप्टेंबर रोजी दोन दिवशीय विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान थकीत वीज बिल वसुली आणि वीज पुरवठ्याची तांत्रिक पाहणी करून नियमानुसार काही वीज जोडण्या खंडित करण्याची प्रक्रिया राबवण्यात आली. मात्र, या अचानक झालेल्या कारवाईमुळे आणि पथकासोबत झालेल्या संवादातील गैरसमजांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये काही प्रमाणात नाराजी व विविध प्रश्न उपस्थित झाले आहेत.

वरिष्ठांच्या सूचनेनुसार ही मोहीम सुरू असल्याचे पथकाकडून सांगण्यात आले. मोहिमेदरम्यान गावकऱ्यांनी आणि काही जागरूक नागरिकांनी पथकाकडे या कारवाईची माहिती घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, वेळेच्या



मर्यादेमुळे किंवा नियोजित कामांमुळे पथकाकडून या विषयावर विस्तृत माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये मोहिमेच्या हेतूबद्दल काही शंका निर्माण झाल्या.

तपासणी सुरू असताना परिसरातील काही गावकऱ्यांनी इतर लगतच्या भागांत होणाऱ्या संभाव्य अयोग्य वीज वापराबद्दल पथकाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. त्यावर हे पथक विशिष्ट उद्दिष्टाने आले असल्याचे सांगत कर्मचाऱ्यांनी स्थानिक विभागीय कार्यालयाशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. परंतु, नागरिकांच्या मते सर्वच भागांत समान पद्धतीने पाहणी व कारवाई होणे आवश्यक आहे.

जे ग्राहक नियमितपणे वीज बिलांचा भरणा करतात, त्यांना अनेकदा तांत्रिक कारणांमुळे किंवा वारंवार वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे अडचणींचा सामना करावा लागतो. ही समस्या दूर व्हावी आणि नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा मिळावा, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

स्थानिक पातळीवरील वीज पुरवठ्याचे प्रश्न व पाहणी मोहिमेतील समन्वय यावर यवतमाळ महावितरण विभागाने सकारात्मक मार्ग काढून नागरिकांच्या शंकांचे निरसन करावे, अशी अपेक्षा डोंगरखर्डा परिसरातील ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

# सोन्याच्या दकानातील चोरीचा छडा; ३५४ ग्रॅम दागिने जप्त

## चार आरोपी जेरबंद; तक्रारदारास मुद्देमाल परत

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**बाभूळगाव :** यवतमाळ शहरातील सोन्या-चांदीच्या दुकानात झालेल्या चोरीचा बाभूळगाव पोलिसांनी छडा लावला असून, तीन प्रौढ आरोपींसह एका अल्पवयीनास ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून चोरीस गेलेले ३५४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले. पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या हस्ते हा मुद्देमाल तक्रारदारास परत करण्यात आला..

यवतमाळ येथील अग्रवाल लेआउट परिसरातील रहिवासी जितेंद्र प्रेमचंद तातेड (४८) यांचे सोन्या-चांदीचे दुकान आहे. २५ जुलै रोजी दुकान बंद करून ते घरी गेले होते. त्यानंतर २७ जुलै रोजी सकाळी दहाच्या सुमारास दुकानाचे गेट एका बाजूने निघालेले दिसून आले. संशय आल्याने तातेड यांनी दुकानात जाऊन पाहणी केली असता कडी-



कोयंडा तोडल्याचे निदर्शनास आले. दुकानातील सोन्याचे विविध दागिने चोरीस गेल्याचे आढळून आले.

चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये मणी, बदामी अंगठ्या, वेढे, डोर्ले, बाळ्या, कुड्या, कानातील लहान-मोठे रिंग, कानातील लटकन, बाळी, ओम लॉकेट, झुमके, कानवेल व जिवती आदींचा समावेश होता.

या दागिन्यांची किंमत सुमारे १७ लाख १० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

या प्रकरणी बाभूळगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान अजय मोहन काळे ऊर्फ पारधी (२६), विनोद बानसोड पवार (४६), मंगलसिंग ऊर्फ बबलू सुरेश पारधी (१९) तसेच एका अल्पवयीन आरोपीचा सहभाग निष्पन्न झाला.

पोलिस निरीक्षक दिपमाला भेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई केली. हस्तगत केलेले सोन्याचे दागिने तक्रारदारास परत करण्यात आले.

# रंगनाथ स्वामी पतसंस्थेला ३.०८ कोटींचा नफा

## ३७ व्या वार्षिक सभेत आर्थिक प्रगतीचा आढावा; सभासदसंख्या ९८ हजारांहून अधिक

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**वणी :** श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्थेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी वसंत जिनिंग हॉल येथे उत्साहात पार पडली. सभेला संस्थेचे बहुसंख्य सभासद उपस्थित होते. आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील आर्थिक अहवालासह संस्थेच्या प्रगतीशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सभेपुढील सर्व विषयांना सभासदांनी मंजुरी दिली.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त झाला असून संस्थेने ३.०८ कोटी रुपयांचा नफा नोंदविला आहे. संस्थेची एकूण उलाढाल ६४९१ कोटी रुपये झाली असून सभासदसंख्या




९८ हजारांहून अधिक आहे. महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्रात संस्थेच्या २१ शाखा व मुख्य कार्यालय कार्यरत आहेत. सभासदांच्या ठेवी ९४० कोटी रुपये असल्याची माहिती सभेत देण्यात आली.

सामाजिक कार्यासोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, पारदर्शक व्यवहार तसेच कायदे व नियमांचे काटेकोर पालन करून संस्थेचे आर्थिक व्यवहार सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

संस्थेचे उपाध्यक्ष विवेकानंद मांडवकर यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याची व आर्थिक प्रगतीची माहिती दिली. सभेचे अध्यक्ष अॅड. देविदासजी काळे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करून सभासदांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. सभेपुढील विषयांचे वाचन व सभेचे संचालन मुख्य कार्यकारी अधिकारी संजय दोरखंडे यांनी केले. संचालक सुरेशराव बरडे यांनी आभार मानले.

यावेळी सुधीर दामले, हरिशंकर पांडे, रमेश भोंगळे, सुरेशराव बरडे, परीक्षित एकरे, अॅड. घनश्याम निखाडे, डॉ. भूपाळराव पिंपळशेंडे, चिंतामण आगलावे, पुरुषोत्तम बद्दमवार, उदय रायपुरे, लिंगारेड्डी अंडेलवार, अरविंद ठाकरे, सुनील देठे, सौ. छायाताई ठाकूरवार, सौ. निमाताई जीवने यांच्यासह सभासद, कर्मचारी व अभिकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेंगा पोडचा रस्ता रखडला

## गावकऱ्यांचे तहसीलदारांना साकडे

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**झरी-जामणी :** तालुक्यातील रेंगा पोड येथील मुख्य रस्ता गेल्या ७ ते ८ वर्षांपासून अत्यंत बिकट आणि अपूर्ण अवस्थेत पडून आहे. हा रखडलेला रस्ता तातडीने पूर्ण करून नाल्यावर पुलाचे बांधकाम करावे व मार्ग वाहतुकीसाठी खुला करावा, या मागणीसाठी रेंगा पोड येथील ग्रामस्थांनी झरी-जामणीच्या तहसीलदारांना निवेदन सादर केले.

काही वर्षांपूर्वी या रस्त्याचे काम सुरू होऊन खडीकरण करण्यात आले होते. मात्र, एका शेतकऱ्याच्या शेतीच्या वारसा हक्काच्या वादामुळे काम अचानक थांबले. विशेष म्हणजे, संबंधित शेतकऱ्यांपैकी एकाने रस्त्यासाठी पूर्ण सहमती दर्शवूनही



प्रशासनाकडून पुढील पावले उचलण्यात आली नाहीत. रस्त्यावरील नाल्यावर पुलाचे काम न झाल्याने पावसाळ्यात रस्त्याची चाळण होते. यामुळे आजारी व्यक्ती, गर्भवती महिला, वृद्ध आणि विद्यार्थ्यांना दररोज मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रशासनाने तात्काळ प्रत्यक्ष पाहणी करून रस्ता व पुलाचे काम पूर्ण करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी नितेश आस्वले, अशोक आत्राम, रघुनाथ आत्राम, भीमराव टेकाम, मारोती टेकाम, हनुमान टेकाम, गुलाब टेकाम, राकेश आत्राम, लक्ष्मण टेकाम, लेतू टेकाम, भाऊराव टेकाम, वसंता टेकाम, संतोष आत्राम, सुधाकर टेकाम, प्राजित आत्राम, हरिदास आत्राम, अविनाश टेकाम आणि सोनेराव दडांजे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना दिलासा देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अमरावती:** अमरावती विभागात सर्व जिल्ह्यात दुष्काळाची झळ पोहचली आहे. यामुळे पिके संकटात आली आहेत. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून या भागाचा दौरा केला आहे. शेतकऱ्यांना तातडीने मदत व्हावी, यासाठी दुष्काळाच्या संहितेच्या ट्रिगर एक नुसार देण्यात येणाऱ्या मदतीचा आदेश उद्याच काढण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

वाशिम येथील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिय येरेकर,



वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासमवेत अमरावती विमानतळ येथे चर्चा केली. त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना दुष्काळाची मदत करण्यासाठी केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाकडून तातडीने मदत देण्यात येईल. तसेच केंद्राच्या मदतीसाठी आवश्यक असणारे पंचनामे आदी प्रक्रिया करून मदतीसाठी प्रस्ताव पाठवण्यात येईल.

शेतकऱ्यांना मदतीचा आदेश तातडीने काढणे गरजेचे आहे. यातून काही भाग वगळला गेलेला असण्याची शक्यता असल्याने तिसऱ्या ट्रिगरमध्ये वगळलेल्या भागाचा समावेश करण्यात येईल. सर्वच भागात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ असल्याने मदतीची कारवाई करण्यात येणार आहे.

येत्या काळात चाराटंचाई, पाणीटंचाईबाबत उपाययोजना करून अन्नधान्याचीही मदत करावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडू नये, यासाठी थेट मदत करण्यात येईल.

रब्बीमध्ये काही ठिकाणी उपलब्ध असलेल्या पाण्यावर पिके घेण्याबाबत तपासणी करण्यात येईल. तसेच रब्बी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल.तसेच, रोजगार उपलब्ध होण्यासाठी जलसंधारणाच्या कामावर भर देण्यात येईल. जलसाठे आटलेले असल्यामुळे यातील गाळ काढणे, जलतारा स्ट्रक्चर निर्माण करणे, दुरुस्ती करणे आवश्यक असलेले तलाव शोधून त्यांची दुरुस्ती करण्यात येईल.

सर्वदूर पिकांची परिस्थिती सारखीच असल्यामुळे राज्य शासनाने मदतीचे धोरण आखले आहे. शेतकऱ्यांना करण्यात येणारी ही मदत दिवाळीपूर्वी मिळेल, याचे नियोजन केले जाईल.राज्य शासनाने कर्जमाफी केली असून कर्जाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांना नियमाप्रमाणे कर्ज द्यावेच लागेल. त्यासोबतच शेतमालाची शासकीय दराने खरेदी केली जाईल.

# घरगुती गॅस सिलिंडरमधून ऑटोरिक्षामध्ये रिफिलिंग करणाऱ्या टोळीवर धडक कारवाई

## पाच जणांना अटक,१२ लाख ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अमरावती :** घरगुती एलपीजी सिलिंडरमधून ऑटोरिक्षामध्ये बेकायदेशीर गॅस रिफिलिंग करणाऱ्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती (ग्रामीण) यांच्याकडून कारवाई करण्यात आली. यामध्ये पाच आरोपींना अटक करून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अत्यावश्यक वस्तूंचा होणाऱ्या काळाबाजारवर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण येथील अधिकारी व अंमलदार यांना निर्गमीत केल्या होत्या. त्याअनुषंगाने, २४ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन नांदगाव खंडेश्वर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत खबर मिळाली की, बहिरमबाबा टेकडी ावळ, चांदुर रेल्वे रोड,



नांदगाव खंडेश्वर येथे शेख जमीर शेख अल्लाउद्दीन रा. नांदगाव खंडे. हा घरगुती वापरासाठी असलेल्या एलपीजी गॅस सिलिंडरमधून ऑटोरिक्षामध्ये इलेक्ट्रीक मोटारच्या सहाय्याने एलपीजी गॅसचे अनधिकृतरीत्या रिफीलींग करीत आहे. यावरून सदर ठिकाणी फाल्गुन कास्टे, तहसील कार्यालय, नांदगाव खंडेश्वर व पंच यांचेसह जाऊन धाड टाकली. यावेळी शेख जमीर शेख अल्लाउद्दीन हा ऑटोमध्ये अवैधरीत्या विनापरवाना घरगुती वापरासाठी असलेल्या एलपीजी गॅस सिलिंडरमधून ऑटो रिक्षामध्ये रिफीलींग करताना आढळून आला. तसेच त्यांचे ऑटोमध्ये घरगुती वापराचे सिलिंडरसह रिफिलींगकरिता मिळून आले. त्यामुळे आरोपी शेख जमीर शेख अल्लाउद्दीन (३०), अल्तमश खान शब्बीर खान (२३), अब्दुल कय्युम शेख मेहबुब (४२), रविंद्र गोविंदराव वानखडे (५७) आणि शेख मुन्ना शेख शब्बीर (२४) सर्व रा. नांदगाव खंडेश्वर यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून कारवाई दरम्यान ४ ऑटोरिक्षा (१२ लाख), घरगुती वापराचे ५ सिलिंडर (११ हजार २५०), इलेक्ट्रीक गॅस रिफिलींग पंप मशीन २ (१० हजार), रिफिलींग नळया १० नग (२५०० रू.), नोझल ४ नग (२००० रू.), वजन काटा (५०००), असा एकूण

# जिल्हा सामान्य रुग्णालयात ‘पोषण आहार’ आणि ‘अनेमिया’ जागृती

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अमरावती:** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय येथे बालरोग कक्षामध्ये नुकताच ‘राष्ट्रीय पोषण आहार मास’ आणि ‘अनेमिया’ (रक्तक्षय) जागृती कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल बत्रा यांच्या मार्गदर्शनाखाली 16 सप्टेंबर 2026 रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला बालरोगशास्त्र



विभागाचे सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. मिलिंद सूर्यवंशी, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या बालरोगतज्ञ डॉ. सोनाली शिरभाते, अधिसेविका ललिता अटाळकर, तसेच आहारतज्ञ वैशाली चव्हाण व राजनंदिनी राठोड उपस्थित होत्या.

“हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी” या घोषवाक्याला अनुसरून हा पोषण आहार मास साजरा केला जात आहे.पोषण आहार प्रदर्शनीचे आयोजन आणि मार्गदर्शन कार्यक्रमादरम्यान रुग्णालयात उपस्थित रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये आहाराविषयी जनजागृती करण्यात आली. आहारतज्ज्ञांनी रोजच्या जेवणात पोषण मूल्यांचे महत्त्व सांगतानाच जंक फूड टाळणे, लठ्ठपणावर नियंत्रण, कुपोषण निर्मूलन आणि लहान मुलांसाठी आईच्या दुधाचे (स्तनपान) महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी जनऔषधवैद्यकशास्त्र विभागाच्या प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. कल्पना काळे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली ‘पोषण आहार प्रदर्शनी’ आयोजित करण्यात आली होती.

# क्रीडा विभागाच्या योजनांचा लाभ घ्यावा - उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे

## श्री बजरंग गणेशोत्सव मंडळात ‘लोकसंवाद’

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अमरावती:** घरातच क्रीडा विषयक वातावरण व त्यातून सुरु झालेला प्रवास, पुढे विविध स्पर्धांमधील यश ते उपजिल्हाधिकारी पदाची जबाबदारी असा प्रेरणादायी प्रवास उलगडतांना उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे यांनी क्रीडा क्षेत्रात कार्यरत सर्व घटकांनी क्रीडा विभागाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन येथील पटवीपुरा स्थित श्री बजरंग गणेशोत्सव मंडळात आयोजित लोकसंवाद कार्यक्रमात केले.



खेलो इंडिया, टार्गेट ऑलिम्पिक पोडियम, व्यायामशाळा विकास योजना, क्रीडांगण विकास योजना, खेळाडूंकरिता गौरव व प्रोत्साहन व बक्षिसे, शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान आदी महत्वाच्या केंद्र व राज्य शासनाच्या क्रीडा विभागाच्या योजना राबविण्यात येत आहेत. त्यामुळे गेल्या दशकात क्रीडा क्षेत्राच्या विकासाला गती मिळाली आहे. या योजनांचा लाभ क्रीडा क्षेत्रातील घटकांनी घ्यावा असे श्रीमती देवरे म्हणाल्या.

माहिती व जनसंपर्क विभाग गणेशोत्सवा दरम्यान राज्यभर शासकीय योजनांच्या माहितीवर आधारीत ‘लोकसंवाद’ हा संवादात्मक कार्यक्रम राबवित आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाने गुरुवारी श्री बजरंग गणेशोत्सव मंडळात लोकसंवाद कार्यक्रमाचे आयोजन केले. जिल्हा क्रीडा कार्यालयाच्यावतीने यावेळी क्रीडा व युवक संचालनालय तसेच क्रीडा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रदर्शनी लावली व नागरीकांना माहिती दिली. श्री. बजरंग गणेशोत्सव मंडळात दर्शनाकरिता आलेल्या उपजिल्हाधिकारी श्रीमती देवरे या स्वत: उत्तम खेडाळू असल्याने त्यांनी लोकसंवाद कार्यक्रमात सहभाग घेवून उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या देदिप्यमान प्रवासाबद्दल ऐकूण उपस्थितांनी त्यांना क्रीडा कारकिर्दी विषयी व शासकीय योजनांचा त्यांना क्रीडापटू म्हणून झालेला फायदा याविषयी प्रश्न विचारले व त्यांनीही या प्रश्नांची खुमासदार उत्तरे दिली.

# जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे विशेष अभियान

## प्रलंबित अर्जदारांसाठी त्रुटीपूर्तता शिबिर, मार्गदर्शन सत्रे

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अमरावती :** जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे सेवा संकल्प अभियानात शैक्षणिक प्रवेश आणि प्रलंबित अर्जांच्या त्रुटीपूर्ततेसाठी विशेष शिबिर, वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष 2026-2027 मध्ये अकरावी आणि विज्ञान शाखेत बारावी, तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केले आहेत, मात्र ज्यांचे अर्ज त्रुटीअभावी समितीकडे प्रलंबित आहेत, अशा अर्जदारांसाठी हे शिबिर घेण्यात येत आहे.

अर्जदारांनी आवश्यक त्रुटींची पूर्तता करण्यासाठी अमरावती येथील कार्यालयात प्रत्यक्षात उपस्थित राहण्यासाठी दि. 25 सप्टेंबर, दि. 5 ऑक्टोबर, दि. 8 ऑक्टोबर, दि. 12 ऑक्टोबर या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच तालुक्यातील सर्व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयांतील मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी दि. 29 सप्टेंबर आणि दि. 6 ऑक्टोबर रोजी वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

जात वैधता प्रमाणपत्राबाबत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी दि. 7 ऑक्टोबर रोजी शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती आणि दि. 13 ऑक्टोबर रोजी श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी व पालकांनी या मार्गदर्शन शिबिरांचा आणि त्रुटीपूर्तता शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त तथा सदस्य जया राऊत यांनी केले आहे.

# अवैध गावठी हातभट्टी दारु निर्मितीविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

## 2800 लिटर मोहा मास सडवा व गावरानी दारू नाश

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अमरावती :** अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मितीविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; 2800 लिटर मोहा मास सडवा व गावरानी दारू नाश व दारू निर्मितीचे साहित्य जप्त करण्यात आला.

निकेतम कदम, पोलीस अधीक्षक यांनी ग्रामीण जिल्हयात होणाया चोरी, घरफोडी, इत्यादी गुन्हे उघडकीस आणण्याबाबत व अवैद्य धंदे यावर कार्यवाही करणेबाबत स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांना निर्देशीत केले आहे. २५/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणच्या पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन कुर्हा हद्दीतील धारवाडा शेतशिवार, वर्धा नदीकाठ येथे सुरू असलेल्या अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मिती अड्डयावर छापा टाकून धडक कारवाई करण्यात आली. सदर कारवाईमध्ये अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीच्या अनुषंगाने एकूण ०४ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यामध्ये ०१ मुख्य मालक/चालक व ०३ कामगारांचा समावेश आहे.

अटक आरोपी : जितेश उर्फ गोखरू रामु राठोड, वय ३२ वर्षे, रा. शिदवाडी, ता. तिवसा, जि. अमरावती. महेश लक्ष्मण कोळबते, वय ३१ वर्षे, रा. लहादेवी, ता. आर्वी, जि. वर्धा., मंगेश जनार्दन श्रीरामे, वय ३० वर्षे, रा. लहादेवी, ता. आर्वी, जि. वर्धा, धिरज विजय धानके, वय २९ वर्षे, रा. खुब्बगाव, ता. आर्वी, जि. वर्धा. असे आहे. जप्त/नष्ट करण्यात आलेला मुद्देमाल : २७५ लिटर तयार गावठी हातभट्टी दारू किंमत ₹२७,५००/-, २८०० लिटर मोहा मास सडवा किंमत ₹२,८०,०००/-, २ TVS ज्युपिटर मोपेड अंदाजे ₹१,६०,०००/-, २ अँड्रॉइड मोबाईल किंमत ₹२०,०००/,* युरिया खत ०४ किलो ११००/- नवसागर ०१ किलो ₹४००/- दारू निर्मितीचे साहित्य, भांडी, टोपले व नळ्या १२,४००/- एकूण मुद्देमालाची किंमत ₹४,९०,४००/- घटनास्थळी आढळून आलेला मोहा मास सडवा व दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे संबंधित साहित्य पंचांसमक्ष नष्ट करण्यात आले. तसेच, आरोपींकडून तयार गावठी दारूमध्ये युरिया व नवसागर यांसारख्या पदार्थांची भेसळ करून मानवी आरोग्यास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने अवैध दारू निर्मिती केली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी BNS कलम १२३, २७४, २७५ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ), ६५ (क), ६५(ड), ६५ (ई) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. घटनास्थळाचा पंचनामा दि. २५/०९/२०२६ रोजी १३:४५ ते १४:२० वा. दरम्यान पूर्ण करण्यात आला असून, तयार दारू, युरिया व नवसागरचे नमुने नियमानुसार सीलबंद करून सी.ए. परीक्षणासाठी ताब्यात घेण्यात आले आहेत.

# पत्रकाराच्या मुलाची लंडनमध्ये मोठी भरारी; अभिनव कदम देशमुख याने मिळवली सायबर सिक्युरिटी मध्ये मास्टर्स डिग्री

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**चांदूर रेल्वे:** चांदूर रेल्वे तालुक्यातील पत्रकार निशिकांत कदम (देशमुख) यांच्या मुलाने लंडन सारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठात घवघवीत यश संपादन करून तालुक्याचा नावलौकिक वाढवला आहे.

चांदूररेल्वे पत्रकार निशिकांत कदम देशमुख यांचे सुपुत्र अभिनव निशिकांत कदम देशमुखयांनी लंडन विद्यापीठ, रॉयल हॉलोवे अँड बेडफोर्ड



न्यू कॉलेज मधून अप्लाइड डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटी या विषयात गुणवत्तेसह विज्ञान पदव्युत्तर (मास्टर ऑफ सायन्स) पदवी प्राप्त केली आहे. त्यांचा पदवीदान सोहळा 14 डिसेंबर २०२६ रोजी लंडन येथे पार पडणार आहे. सायबर सिक्युरिटी सारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि आधुनिक काळाची गरज असलेल्या क्षेत्रात मेरीट सह पदवी मिळवल्याबद्दल अभिनवचे सर्व स्तरातून कौतुक आणि अभिनंदन होत आहे.या यशाबद्दल पत्रकार संघ, सामाजिक,शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनव कदम देशमुख तसेच देशमुख परिवाराचे अभिनंदन करत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# जीएमसीच्या जनसंपर्क अधिकारी पदी डॉ. कल्पना काळे

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अमरावती:** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती (जीएमसी) येथे जनसंपर्क अधिकारी पदी डॉ. कल्पना काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. काळे या सध्या महाविद्यालयात जनऔषधवैद्यकशास्त्र विभागाच्या प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. संस्थेचे अधिष्ठाता डॉ. अनिल बत्रा यांनी या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली आहे.

# शहरात प्रतिबंधात्मक कलम 37 (1) व (3) लागू

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अमरावती:** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम 37 (1) व (3) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून सदर आदेश आज दि. 24 सप्टेंबर ते 8 ऑक्टोबर 2026 च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्ती विरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे प्रभारी पोलीस आयुक्त यशवंत सोळंके यांनी कळविले आहे.

# जलवृक्ष चळवळीचा"चंद्रभागा आपल्या दारी"या पर्यावरण पूरक उपक्रम



प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**दर्यापूर :** गेल्या अनेक वर्षापासून चंद्रभागा नदी स्वच्छ व सुंदर रहावी या उद्देशाने जलवृक्ष चळवळ,नगर परिषद दर्यापूर व विविध सामाजिक,पक्षीय संघटनांच्या वतीने हा पर्यावरण पूरक उपक्रम राबविण्यात येतो.

या चंद्रभागा स्वच्छ ठेवण्याच्या उपक्रमाला श्रद्धाळू गणेश भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद असतो. अनेक गणेश भक्तांनी दहा दिवस अत्यंत श्रद्धेने पूजा केलेल्या मूर्ती विश्वासाने जल रथात विसर्जित करत असतात.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा चंद्रभागा आपल्या दारी हे अभियान जुन्या नगरपालिकेसमोर राबवण्यात येणार आहे.तरी सर्व सन्माननीय गणेश भक्तांनी प्रचंड प्रतिसाद द्यावा. असे आव्हान जल वृक्ष प्रेमींच्या वतीने करण्यात येत आहे.

# ‘महा-उपलब्धी’ अॅपद्वारे मिळणार डिजिटल जीवन प्रमाणपत्र

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अमरावती :** वित्त विभागाच्या निर्देशानुसार निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी ‘महा-उपलब्धी’ हे मोबाईल अॅप दि. 1 जुलै 2026 पासून कार्यान्वित करण्यात आले आहे. या अॅपच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये निवृत्तीवेतनधारकांना घरबसल्या डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची नवी सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

अॅपच्या पहिल्या टप्प्यात पेन्शनधारकांसाठी पेंशन पेमेंट हिस्ट्री, आयकर प्रमाणपत्र, ई-पीपीओ लायब्ररी, आणि फॉर्म-16 यासुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये ऑनलाइन जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे माहे नोव्हेंबर 2026 साठी आवश्यक असणारे जीवन प्रमाणपत्र याच मोबाईल अॅपद्वारे स्वीकारणे प्रस्तावित आहे. या डिजिटल सुविधेमुळे आता निवृत्तीवेतनधारकांना जीवन प्रमाणपत्र सादर करण्यासाठी कोषागार कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय टळणार आहे. जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी ‘महा-उपलब्धी’अॅप मोबाईलमध्ये डाऊनलोड करून घ्यावे. तसेच माहे नोव्हेंबर-2026 चे जीवन प्रमाणपत्र याच अॅपद्वारे सादर करून डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाचे कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) अमोल इखे यांनी केले आहे.

# ना मुसळधार पाऊस, ना भूकंप; तरीही रस्त्यावरील पूल खचला!

## जड वाहतुकीचा परिणाम? ग्रामस्थांनी लावले बॅरिकेड्स; प्रशासनाविरोधात रोष

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**चांदूर रेल्वे:** तालुक्यातील श्रीक्षेत्र सावंगा विठोबा हे विदर्भातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून, कापूराच्या यात्रेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या ठिकाणी वर्षभर मोठ्या संख्येने भाविक येतात. मात्र, चांदूर रेल्वे येथून मांजरखेड मार्गे सावंगा विठोबा येथे जाणाऱ्या प्रमुख मार्गावरील संस्थानचे विश्वस्त लक्ष्मण राठोड यांच्या शेताजवळील पूल अचानक खचल्याने वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, परिसरात ना मुसळधार पाऊस झाला, ना भूकंपासारखी नैसर्गिक घटना घडली, तरीही रस्त्यावरील पूल खचल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. या मार्गावरून होणारी जड वाहतूक



आणि पुलाची झालेली दुरवस्था यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असावी, अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. मात्र, पुलाच्या खचण्याचे नेमके कारण संबंधित प्रशासनाच्या तपासणीनंतरच स्पष्ट होणार आहे.

पूल खचल्यामुळे अपघाताची शक्यता लक्षात घेता पोलीस पाटील हिरासिंग राठोड आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी बॅरिकेड्स लावून हा मार्ग वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. विशेषतः दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनचालकांनी या मार्गावरून जाताना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.रात्रीच्या वेळी या मार्गावर प्रवास करणे जीवावर बेतू शकते असे संस्थान चे विश्वस्त लक्ष्मण राठोड यांचे म्हणणे आहे. संस्थानने वारंवार दिली निवेदने- श्री विठोबा संस्थान,सावंगा विठोबा संस्थानच्या वतीने रस्त्याची व पुलाची दुरुस्ती करण्याबाबत संबंधित प्रशासनाकडे व लोकप्रतिनिधीकडे वारंवार निवेदने देण्यात आली होती, असे संस्थानच्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. मात्र, वेळेत दखल न घेतल्याने आज ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप संस्थांनाचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांनी केला ग्रामस्थाकडून प्रशासनाविषयी रोष व्यक्त होत आहे.

भाविकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा-

पूल खचल्यामुळे श्रीक्षेत्र सावंगा विठोबा येथे येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चांदूर रेल्वे–मांजरखेड मार्गाचा वापर सध्या टाळावा, असे आवाहन श्री विठोबा संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







# पुढच्या वर्षी लवकर या च्या गजरात...

# बाप्पांना निरोप





● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

'गणपती बाप्पा मोरया' चा जयघोष... ढोलताशाचा गजर... गुलालाची अन् फुलांची प्रचंड उधळण अन् ताशांच्या गगनभेदी तालावर थिरकणारी तरुणाई अशा भक्तीमय वातावरणात शहरात श्री गणेश विसर्जन मिरवणुकीतून बाप्पाला निरोप देण्यात आला. यावेळी ढोलताशांच्या प्रचंड गजराने आसमंत दणाणला होता. मिरवणुकीची सुरवात यतवमाळ वाशीम मतदार संघाच्या खासदार संजय देशमुख यांच्या हस्ते मानाचा गणपती शिवशंकर गणेश उत्सव मंडळाच्या मुर्तीची पुजन करून मिरवणुकीला सुरवात करण्यात आली. नंतर शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक काढून ३६ घंटे चालणारी मिरवणूक अवघ्या १८ घंट्यातच ओटोपली. मध्यरात्री १ वाजेपर्यंत श्रीचे विसर्जन बालाजी देव तलावात करण्यात आले.

गणेशोत्सव यावर्षी धूमधडाक्यात गणेश उत्सव साजरा करण्यात आला. गत ११ दिवसाच्या वास्तव्याने भक्तीपूर्ण व मंगलमय वातावरणाने भारून टाकणाऱ्या 'श्री' गणेशाला काल श्रध्दापूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री गणरायाला "बाप्पा मोरया.... पुढच्या वर्षी लवकर या" अशी विनवणी करीत श्री विसर्जन सोहळ्याला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. यावेळी खा. संजय देशमुख, आ. श्याम खोडे, नगराध्यक्ष अनिल केंदळे, पो.अधीक्षक निकेज खानमोटे, समाजसेवक दिलीप जोशी, माजी आ. विजयराव जाधव, डॉ. सुधीर कव्हर, गजाननराव वडजीकर देशमुख, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव इंगोले, माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, नागोराव ठेंगडे, राजु वानखेडे, श्याम दुरतकर, गणेश गाभणे, जुगलकिशोर कोठारी, राजु पाटील राजे, शहर प्रमुख गजानन भांदुर्गे, वसंतराव धाडवे, माधवराव अंभोरे, गोविंदराव रंगभाळ, अनंता रंगभाळ, कॅप्टन प्रशांत सुर्वे, भाजपा शहर अध्यक्ष मनिष मंत्री, डॉ. सिध्दार्थ देवळे, किशोर देशमुख, विजय खानझोडे, बंडु शिंदे, अशोक शिराळ, दिपक गाडे, पंकज इंगोले, भागवत गवळी, आशिष कोठारी, आशिष इंगोले, रमेश पाचपिल्ले यांच्यासह शांतता कमेटीच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर मिरवणुकीला प्रारंभ झाला. शहरातील गणेश विसर्जन मिरवणुकीच्या दृष्टीने सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली. शहरातील गणेश मंडळांनी मिरवणुकीत परवानगी घेवून सहभागी झाले होते. गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये शिवशंकर गणेश उत्सव मंडळ, संत रविदास गणेश उत्सव मंडळ, सावतामाळी गणेश उत्सव मंडळ, जयहिंद गणेश उत्सव मंडळ, शिवचौक गणेश उत्सव मंडळ, चामुंडादेवी गणेश उत्सव मंडळ, गणेश पेठ गणेश उत्सव मंडळ, नवयुवक गणेश उत्सव मंडळ, दनकेश्वर गणेश उत्सव मंडळ, चिंतामणेश्वर गणेश उत्सव मंडळ, जयकृष्ण गणेश उत्सव मंडळ, नंदवंशी गणेश उत्सव मंडळ, जयभवानी गणेश उत्सव मंडळ, नवभारत गणेश उत्सव मंडळ, आदी गणेश मंडळांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. गणेश भक्तांसाठी ठिकठिकाणी फराळाचे वाटप करण्यात आले. मनसे, शिवचौक गणेश मंडळातर्फे खिचडीचे वाटप, आसरा माता मंदिरातर्फे खिचडीचे वाटप करण्यात आले. मिरवणुकीत अप्रिय घटना होऊ नये यासाठी ठिकठिकाणी तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

## ३६ घंटे चालणारी मिरवणूक १८ तासात आटोपली

**वाशीमच्या गणेश विसर्जन मिरवणुकीला ऐतिहासीक महत्व आहे. पुर्वी ३६ घंटे चालणारी श्री विसर्जन मिरवणूक कायद्याच्या बडग्यामुळे १८ तासात आटोपली आहे. मिरवणुकीमध्ये दारूमुक्ती, गुलालमुक्ती, नशाबंदी संदेश दिल्यामुळे मिरवणुकीला शहरात शांततेत झाली.**

## लोकप्रतिनिधींनी धरला ठेका,

दरवर्षी प्रमाणे यंदा ही वाशिमची गणपती विसर्जन मिरवणुक मोठ्या थाटात काढण्यात आली. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाला दुग्धाभिषेक करण्यात आले. त्या प्रथम क्रमांक असलेल्या शिवशंकर गणेशोत्सव मंडळाच्या मूर्तीची पूजा करून पारंपारिक पद्धतीने या मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली. यावेळी लोकप्रतिनिधीसह अनेक मान्यवरांनी ढोल ताशांच्या तालावर ठेका धरला या मिरवणुकीची सुरवात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून करून बालू चौक, शिव चौक, सौदागर पुरा, दिघेवाडी चौक, राजनी चौक, माहुरवेश, बागवान पूरा, दंडे चौक, गणेश पेठ, सुभाष चौक, काटिवेश मार्गे फिरून आल्यावर बालाजी तलावमध्ये बाप्पाच्या मूर्तिचे विसर्जन करण्यात आले.

## ठिकठिकाणी महाप्रसादाचे वाटप

विजर्सन मिरवणुकीनिमित्त शहरात ठिकठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सामाजिक संघटनेच्या वतीने पाटणी चौक, रविवार बाजार, शिवाजी चौक, नगर परिषद रोड या भागात महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हेडा, कोठारी, काष्टे, देव, शेळके परिवाराच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला.

## सुरक्षा यंत्रणा सज्ज

**गणेश विसर्जन मिरवणूक शांतेत पार पाडण्यासाठी पोलिस विभागाच्या वतीने तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. ७० पोलिस अधिकारी ११०० पोलिस कर्मचारी ७०० होमगार्ड, एसआरपीची एक तुकडी अशा प्रकारे पोलिस यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती. जिल्हा पोलिस अधीक्षकांनी शांततेत मिरवणूक उत्सव पार पाडण्याचे आवाहन केले होते.**

## थोडक्यात

### य.च.महाविद्यालयात समाजशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यकारीणी घोषीत



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

स्थानिक यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात सत्र २०२६--२०२७ या शैक्षणिक वर्षाकरीता अभ्यास मंडळाची कार्यकारणी २३-०९-२०२६ला घोषित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल सुर्वे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व इतिहास विभाग प्रमुख डॉ.साहेबराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे निवड करण्यात आली.

त्यामध्ये अध्यक्षपदी कु. प्रतिक्षा गि-हे, उपाध्यक्ष रूपाली खडीकार, सचिव निलेश चक्रनारायण, सहसचिव कु.सानिया चाँद गारवे, कोषाध्यक्ष कु. सानिया मोहम्मद गायले, सहकोषाध्यक्ष कु.पुनम चुंबळे, प्रसिद्ध प्रमुख कु . साक्षी भोयर, सहप्रसिध्द प्रमुख कु. मोनिका कर्पे, सल्लागार ? सौ.ममता झिमटे सदस्य कु? अर्पिता लडे, कु.साक्षी प्रगणे, कु.समिक्षा आडोळे, कु.सपना वाघमारे, सुमित चव्हाण.यांची निवड करण्यात आली . डॉ साहेबराव पवार यांनी कार्यकारणी घोषित केली. आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्या दिल्या. प्रा. डॉ.देविदास एस. भगत यांनी यावेळी सविस्तर मार्गदर्शन केले.

समाजशास्त्र अभ्यास मंडळ अंतर्गत घेतले जाणारे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे असे सांगितले.कु., बि.ए भाग १, २, ३ व एम ए भाग १ व २ चे इत्यादी विद्यार्थी उपस्थित होते.

## निधन वार्ता...

### स्वामिनी प्रफुल भुसारी

शहरातील काळे फैल येथील रहिवासी असलेले वृत्तपत्र क्षेत्रातील संगणक चालक प्रफुल्ल भुसारी यांची मुलगी कु.



स्वामिनी प्रफुल्ल भुसारी (वय ६ वर्षे) हिचे दुःखद निधन झाले. प्रफुल्ल भुसारी हे अनेक वर्षांपासून वृत्तपत्र क्षेत्रात संगणक चालक पदावर कार्यरत आहेत. त्यांना दोन मुली असून धाकटी मुलगी स्वामीनी हिला दि. २३ सप्टेंबर च्या रात्री अचानक त्रास जाणवला. दरम्यान उपचार सुरू असताना दुःखद निधन झाले. अचानक आलेल्या या दुःखद संकटामुळे भुसारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दि. २४ सप्टेंबर रोजी पद्मतीर्थ मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# कसे होईल विकासाचे काम, सरपंच मागतो ४० हजारांचे दाम !

## कथित पैशांच्या मागणीची ऑडिओ क्लिप सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

गावाच्या विकासाचा प्रमुख दुवा म्हणून सरपंचाकडे पाहिले जाते. ग्रामस्थांच्या समस्या सोडवणे, विकासकामांना गती देणे आणि शासनाच्या निधीतून गावाचा विकास करणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असते. मात्र, विकासकामातूनच पैशांची मागणी होत असेल आणि त्या मागणीमुळे काम अडत असेल, तर गावाचा विकास होणार तरी कसा? असा थेट सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. कसे होईल विकासकाम; विकासकामातूनच सरपंच मागतो ४० हजारांचे दाम! ऑडिओ क्लिप मुळे खळबळ उडाली आहे.

एका विकासकामाच्या संदर्भात सरपंचांकडून ४० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप समोर आला आहे. या कथित मागणीसंदर्भातील ऑडिओ क्लिप सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती आली आहे. ऑडिओ क्लिपमध्ये संबंधित कामातून 'पाच टक्के' रक्कम देण्यासंदर्भातील कथित संभाषण असल्याचा दावा केला जात आहे. संरपंचाने एवढी रक्कम मला. परवडत नसल्याचे सांगितल्यानंतर 'मला ४० हजार रुपये द्या' अशा आशयाचे संभाषण झाल्याचा दावा करण्यात येत आहे.विकासकामातूनच पैशांची मागणी होत असल्याचा आरोप आणि त्यातून काम रखडल्याची चर्चा यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रत्येक विकासकामातून टक्केवारीची मागणी होत असेल, तर प्रत्यक्ष गावाचा विकास करणार तरी कोण? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित




होत आहे. केनवड सर्कल मधील एका गावातील सरपंचाची ऑडिओ क्लिप सिटी न्युज सुपरफास्ट हाती लागली आहे.गावातील रस्ते, नाली, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांसाठी शासनाचा निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र, कामे करण्याऐवजी पैशांच्या मागणीचे आरोप पुढे येत असतील, तर विकासाचा पैसा नेमका कुठे आणि कसा खर्च होतोय? असा प्रश्नही आता ग्रामस्थ विचारत आहेत.

दरम्यान, घरकुलाच्या लाभासाठीही २०-२० हजार रुपये घेतल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत असल्याची चर्चा आहे. घरकुलासारख्या गरजू कुटुंबांसाठीच्या योजनेतही पैशांची मागणी होत असल्याचा आरोप खरा आहे का, याची प्रशासनाने सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.विकासकामातून ४० हजारांची कथित मागणी, प्रत्येक कामातून पाच टक्के रकमेचा आरोप आणि घरकुलासाठी २०-२० हजार रुपये घेतल्याच्या तक्रारीच्या सर्व आरोपांची एकत्रित चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.या प्रकरणातील ऑडिओ क्लिपची स्वतंत्र तांत्रिक पडताळणी झालेली नसल्याने त्यातील संभाषणाची सत्यता अधिकृत चौकशीत स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच, संबंधित सरपंचांची अधिकृत बाजू अद्याप समोर आलेली नाही. त्यांची बाजू प्राप्त झाल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येईल.आता प्रशासन या गंभीर आरोपांची चौकशी करून सत्य बाहेर आणणार का? विकासकामे मार्गी लावून ग्रामस्थांना दिलासा देणार का? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**घरकुलासाठीही २०-२० हजारांचा आरोप! वसुलीसाठी दलाल ठेवला**

विकासकामातील ४० हजारांच्या कथित मागणीसोबतच घरकुलाच्या लाभासाठीही लाभार्थ्यांकडून २०-२० हजार रुपये घेतल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. गरजू कुटुंबांसाठी असलेल्या घरकुल योजनेत पैशांची मागणी झाल्याचा आरोप गंभीर असून, या प्रकरणाची प्रशासनाने सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर...

# शिवसेना पदाधिकाऱ्यांना ठेवले नजरकैदेत !

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या काही पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी नजरकैदेत ठेवण्यात आले होते.शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन परळीकर, तालुकाप्रमुख अर्जुन भीमराव पाटील सुर्वे यांच्यासह काही शिवसैनिकांना मंगरूळपीर पोलीस ठाण्यात ठेवण्यात आल्याचे पक्षाने म्हटले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली असल्याचे सांगितले जात असले, तरी विरोधी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना अशा प्रकारे ताब्यात ठेवणे योग्य आहे का, असा सवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उपस्थित केला आहे. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा आणि आपल्या राजकीय भूमिका व्यक्त करण्याचा अधिकार असल्याचे सांगत, पदाधिकाऱ्यांना नजरकैदेत ठेवण्याच्या



प्रकारामुळे लोकशाही मूल्यांबाबत प्रश्न निर्माण होत असल्याची प्रतिक्रिया शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. दरम्यान, 'सरकार हमसे डरती है, पुलिस को आगे करती है,' असे नारे शिवसैनिकांनी पोलिस स्टेशन मंगरूळपीर येथे दिले. सत्तेच्या दबावामुळे शिवसैनिकांचा आवाज दाबता येणार नाही, अशी भूमिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने घेतली आहे. भाजप सरकार म्हणजे हुकूमशाही वृत्तीचे सरकार आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकारी यांना नजरकैदेत ठेवून मुख्यमंत्र्यांनी दौरा आटोपता घेतला.केवळ १० मिनिट पाहणी करून शेतकऱ्याच्या कोणत्या भावना मुख्यमंत्र्यांनी समजून घेतल्या असतील हा संशोधनाचा विषय आहे. अर्जुन भीमराव पाटील सुर्वे शिवसेना तालुका प्रमुख मंगरूळपीर शेतकऱ्यांसाठी आवाज उठवणे हा गुन्हा असेल तर हिंदुरुदय सम्राट बाळासाहेबांचे शिवसैनिक म्हणून आम्ही हजार वेळा हा गुन्हा करू.आम्हाला नजर कैद करण्यापेक्षा मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना अजून वेळ दिला असता तर बरं झालं असत असे मत सचिन परळीकर डनिवासी उपजिल्हाप्रमुख यांनी मांडले. तसेच यावेळी डरामराव वाघमारे, अरुण उजवने, ज्ञान्यू भडांगे, उपतालुका प्रमुख दिलीप बुरे, विनोद वैद्य, संतोष लांभाडे, सुभाष शिंदे, महेंद्र ठाकरे, संदीपान भगत, देवेंद्र परंडे, अमोल ठाकरे, संगेश कांबळे, शेखर ठाकरे, श्रीकृष्ण सुर्वे, गजानन सुर्वे, हरीभाऊ सुर्वे, ऋषिकेश जाधव, गौरव बोरकर, भूषण सुर्वे, यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# कवी शेषराव धांडे यांच्या कवितेचा गोंडवाना विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

प्रसिद्ध विद्रोही कवी शेषराव पिराजी धांडे यांच्या 'मी मिसळवत नाही सुरात सूर' या बहुचर्चित कवितेचा गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या बी.ए. तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्राच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात त्यांच्या कवितेला स्थान मिळाल्याने मराठी साहित्यविश्वात कवी धांडे यांच्या काव्यलेखनाची दखल पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.



आपल्या सशक्त, परखड आणि विद्रोही काव्यशैलीतून कवी शेषराव धांडे यांनी समकालीन मराठी कवितेत स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. सामाजिक वास्तव, विसंगती, अन्याय, अस्वस्थता आणि प्रस्थापित व्यवस्थेला प्रश्न विचारणारी त्यांची कविता वाचकांना अंतर्मुख करण्यासोबतच विचारप्रवृत्त करते. त्यांच्या कवितेतील सामाजिक भान आणि विद्रोही जाणिवेने मराठी साहित्याच्या क्षेत्रात स्वतंत्र वाचकवर्ग निर्माण केला आहे. कवी धांडे यांचे 'विद्रोही', 'रस्ता सोडून चालला कुठे', 'आमचा आलेख कोरा', 'बिघडलेले होकायंत्र' आणि 'मैलाच्या दगडाचा लिलाव' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून त्यांच्या साहित्याची साहित्यिक वाचकांकडून दखल घेतली गेली आहे. विशेष म्हणजे, कवी शेषराव धांडे यांच्या कवितांचा विद्यापीठीय अभ्यासक्रमातील समावेश हा यापूर्वीही झाला आहे. मुंबई विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या तीन विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात त्यांच्या कवितांचा समावेश झालेला आहे. आता गोंडवाना विद्यापीठातही त्यांच्या कवितेला अभ्यासक्रमात स्थान मिळाल्याने त्यांच्या काव्याचा समावेश करणाऱ्या विद्यापीठांची संख्या चार झाली आहे. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात एखाद्या कवीची कविता समाविष्ट होणे ही केवळ त्या कवीच्या साहित्यकृतीची दखल नसून, त्या कवितेतील आशय, सामाजिक संदर्भ, साहित्यिक मूल्य आणि विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त करण्याची क्षमता यांचीही शैक्षणिक पातळीवर झालेली नोंद मानली जाते. गोंडवाना विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात 'मी मिसळवत नाही सुरात सूर' या कवितेचा समावेश झाल्याची बातमी समोर आल्यानंतर साहित्यिक, अभ्यासक, कवी, विद्यार्थी आणि रसिक वाचकांकडून कवी शेषराव धांडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विसर्जन मिरवणूक; उत्साहपूर्ण वातावरणात बाप्पाला निरोप

## "गणपती बाप्पा मोरिया... पुढच्या वर्षी लवकर या..." या जयघोषाने खामगाव दुमदुमले

सुरज बोराखडे २६ सप्टेंबर

**खामगाव:** विघ्नहर्ता श्री गणेश यांना निरोप देताना, येथील गणेशभक्तांनी 'गणपती बाप्पा मोरिया... पुढच्या वर्षी लवकर या' यासह श्री गणेशाची भक्तीगीते गायली आणि ढोल-ताशांच्या गजरात गुलाल उधळला. शुक्रवारी, श्री अनंत चतुर्थीच्या दिवशी, श्री गणेशभक्तांनी विघ्नहर्ता श्री गणेश यांना निरोप दिला. याप्रसंगी, परिसर श्री गणेशाच्या जयघोषाने दुमदुमला होता.

सर्वप्रथम, सकाळी ९ वाजता स्थानिक अय्याची कोठी येथून मानाच्या गणपतीच्या लाकडी गणपती ने विसर्जन मिरवणुकीला सुरुवात केली, जिथे मूर्तीची पूजा आणि आरती करण्यात आली. फारसी चौकात पोहोचल्यावर, भक्तांनी मूर्तीच्या पायाशी मस्तक टेकवून तिला पुष्पहार अर्पण केले आणि विधीवत पूजा केली. लाकडी मूर्तीच्या मागे श्री तानाजी गणेश मंडळ आणि श्री हनुमान गणेश मंडळ रांगेत उभे राहिले. नेहमीप्रमाणे, या वर्षीही मान का गणपतीच्या लाकडी मूर्तीची सजावट, बैलगाडीवर बसलेली मूर्ती आणि बैलगाडी ने भक्तांचे लक्ष वेधून घेतले. ढोल-ताशांच्या पारंपरिक गजरात आणि गणपतीच्या गजरात मिरवणूक सुरू झाली. भव्य गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. खामगाव मध्ये गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी पोलीस प्रशासनाने मिरवणुकीच्या मार्गावर बॅरिकेड्स





उभारले होते. अतिरिक्त पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली, एक अतिरिक्त पोलीस अधीक्षक, उपअधीक्षक, सहाय्यक पोलीस अधीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस कर्मचारी, राज्य राखीव पोलीस दल, केंद्रीय राखीव पोलीस दल, सीआयएसएफ, होमगार्ड, एसआरपीएफची एक तुकडी आणि आरसीपीची एक तुकडी तैनात करण्यात आली होती. बुलढाणा जिल्ह्यातील प्रमुख शहर असलेल्या खामगाव मध्ये भव्य विसर्जन मिरवणूक आयोजित केली जाते. गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत आणि उत्साहात पार पडावी यासाठी पोलीस प्रशासनाने कडक पोलीस बंदोबस्त ठेवला होता, ज्यामुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले. गणेश विसर्जन मिरवणूक फारसी, मोहन टॉकीज चौक, महावीर चौक, केडिया टर्निंग, निर्मल टर्निंग पॉईंट, मस्तान चौक, दलफैल, शिवाजी वेस, बोरीपुरा या मार्गावरून गेली. सुरक्षेच्या दृष्टीने, निर्मल टर्निंग पॉईंट ते राणा गेट आणि शिवाजी बेस ते बोरीपुरा या भागातील वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले होते. सुरक्षेच्या कारणास्तव या भागात कलम १४४ लागू करण्यात आले होते.

# जनता महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा



प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**मलकापूर:** जनता कला वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर येथे २४ सप्टेंबर २०२६ राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या दिवसाच्या निमित्ताने पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका तसेच लघु नाटिका अश्या विविध कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी व्यसनांचे होणारे दुष्परिणाम या बद्दल माहिती सांगितली तसेच व्यसनांपासून दूर राहिल्यास जीवन कसे सुखी आणि सुंदर होते यावर आपले विचार व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधीर चव्हाण हे होते तर प्रमुख वक्ते डॉ. देविदास दरेगावे, प्राचार्य धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय मलकापूर तसेच तालुका समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना हे होते. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चव्हाण यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विषद केले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर डॉ. देविदास दरेगावे यांनी राष्ट्रीय सेवा योजना संबंधी सखोल माहितीचे विवेचन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रफुल्लचंद्र भोगे, रा.से. यो. तर आभार प्रदर्शन डॉ. पूनम काबरा, महिला कार्यक्रम अधिकारी, रा.से. यो. यांनी केले.

संपन्न झालेल्या विविध स्पर्धांचे परीक्षन डॉ. एस.एस. शुक्ला, डॉ. टी. पी. मोरे, प्रा. शारदा खाचणे तसेच प्रा. पल्लवी चौधरी यांनी केले. कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. योगेश सरदार, डॉ. कौस्तुभ इंगळे तसेच प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यांनी विशेष सहकार्य केले.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर 30 सप्टेंबरला खामगावात एल्गार!

## हजारोंच्या संख्येने शेतकऱ्यांनी आक्रोश मोर्चात सहभागी व्हावे- आमदार सिद्धार्थ खरात

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**जळगाव जामोद:** बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ३० सप्टेंबर रोजी खामगाव येथे शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाच्या नियोजनासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जळगाव जामोद कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आढावा बैठक घेण्यात आली.आमदार सिद्धार्थ खरात, लोकसभा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर,जिल्हाप्रमुख गजानन वाघ आणि सहसंपर्कप्रमुख दत्ता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत मोर्चाच्या



नियोजनासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.बुलढाणा जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या हाताशी आलेली पिके संकटात सापडली आहेत.राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करण्यात आली असताना बुलढाणा जिल्ह्याचाही दुष्काळसदृश परिस्थितीच्या यादीत समावेश करावा, अशी मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी केली.यासोबतच शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीजपुरवठा, सरसकट कर्जमाफी, सातबारा कोरा करणे, पीक विम्याची तत्काळ रक्कम अदा करणे, तसेच जळगाव जामोद तालुक्यात दीड महिन्यापूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली.दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपये मदत द्यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.प्रा. नरेंद्र खेडेकर यांनी शेतकऱ्यांच्या हक्काच्या प्रश्नांसाठी होणाऱ्या या मोर्चात प्रत्येक गावातून मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे,असे आवाहन केले. जिल्हाप्रमुख गजानन वाघ यांनी मोर्चाच्या तयारीचा आढावा घेत पदाधिकारी,शिवसैनिक आणि शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.बैठकीस उपजिल्हाप्रमुख तुकाराम काळपांडे,विधानसभा संघटक भीमराव पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख शुभम पाटील, अल्पसंख्याक सेना जिल्हाध्यक्ष मुस्ताक भाईजान, उपतालुकाप्रमुख पुंडलिक पाटील, संग्रामपूर उपतालुकाप्रमुख विजय मारोडे, जनार्दन कराळे,शहरप्रमुख रमेश ताडे, माजी शहरप्रमुख कैलास राजपूत, युवासेनेचे संकेत रहाटे, जिल्हा उपप्रमुख विशाल पाटील, जिल्हा उपप्रमुख पंकज मिसाळ, तालुकाप्रमुख डॉ. प्रशांत इंगळे यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि शेतकरी बांधव उपस्थित होते.

# नाल्या तुंबल्याने सांडपाणी घरात; ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**खामगाव :** सुटाळा खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील वॉर्ड क्रमांक २ मधील काशी नगर, मालू ले-आउट आणि सावजी ले-आउट परिसरातील सार्वजनिक नाल्या व गटारे अनेक दिवसांपासून तुंबल्याने सांडपाण्याचा निचरा ठप्प झाला आहे. परिणामी सांडपाणी नागरिकांच्या घरांमध्ये शिरत असून, दुर्गंधी आणि डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येने त्रस्त झालेल्या नागरिकांनी बुधवारी सरपंच व ग्रामसेवकांना निवेदन देऊन तातडीने नाल्या व गटारे साफ करून सांडपाण्याचा निचरा सुरळीत करण्याची मागणी केली. वेळेवर साफसफाई न झाल्याने नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घाण साचली असून, परिसरात अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हितेश गणवाणी, सचिन कदम, वसंत रत्नपारखी यांच्यासह परिसरातील काही नागरिकांच्या घरात सांडपाणी शिरल्याचेही निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून, आजारांचा धोका वाढल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

### ग्रामपंचायतीच्या जबाबदारीकडे लक्ष वेधले !

» महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील संबंधित तरतुदींनुसार सार्वजनिक रस्ते, गटारे व नाल्यांमधील अडथळे दूर करून सार्वजनिक उपद्रव रोखणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असल्याकडे नागरिकांनी निवेदनातून लक्ष वेधले आहे. मागणीवर तातडीने कार्यवाही न झाल्यास वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रार करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# शेतातील विद्युत मोटार चोरीला; अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**शेगाव:** वरवट रोडवरील एका ढाब्यासमोर असलेल्या शेतातील विहिरीतून ५ एचपीची विद्युत मोटार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी उघडकीस आली. याप्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दौलतपुरा, शेगाव येथील आकाश हरीभाऊ धनोकार (५४) हे २३ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास शेतात गेले होते. त्यावेळी त्यांना विहिरीच्या काठावर पाइपचे तकडे पडलेले दिसले. संशय आल्याने त्यांनी विहिरीत पाहिले असता, विहिरीत बसविलेली ५ एचपीची विद्युत मोटार जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. धनोकार यांनी परिसरात मोटार व चोरट्याचा शोध घेतला; मात्र मोटार मिळून आली नाही. त्यानंतर त्यांनी शेगाव शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.चोरीस गेलेल्या मोटारीची किंमत १२ हजार ५०० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पुढील तपास पोहेकॉ चव्हाण करीत आहेत.

# ई-केवायसीच्या नावाखाली रेशन दुकानदारांची फरपट

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**साखरखेर्डा :** रेशन कार्डधारकांची e-KYC पूर्ण करण्याच्या प्रशासनाच्या मोहिमेमुळे रेशन दुकानदारांची पुन्हा एकदा मोठी कोंडी झाली आहे. ३० सप्टेंबरपूर्वी e-KYC पूर्ण न झाल्यास संबंधित लाभार्थ्यांचे धान्य बंद होण्याची शक्यता असल्याने दुकानदारांवर कामाचा अतिरिक्त ताण आला आहे. वारंवार सूचना देऊनही अनेक लाभार्थ्यांकडून e-KYC पूर्ण केली जात नसल्याने दुकानदारांची अक्षरशः धावपळ सुरू आहे. विशेष म्हणजे, धान्य बंद झाल्यानंतरच अनेक लाभार्थ्यांच्या लक्षात e-KYCबाकी असल्याचे येते. त्यानंतर मात्र लाभार्थी रेशन दुकानदारांकडे धाव घेतात. त्यामुळे प्रशासनाच्या प्रक्रियेचा सर्वाधिक फटका रेशन दुकानदारांना बसत असल्याची भावना दुकानदारांमध्ये व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील अनेक लाभार्थी गरीब व कष्टकरी कुटुंबातील असून, त्यांच्या रेशन कार्डवरील काही सदस्य रोजगारासाठी परगावी गेलेले आहेत. अशा सदस्यांना प्रत्यक्ष उपलब्ध करून e-KYC पूर्ण करून घेणे दुकानदारांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. त्यामुळे प्रशासनाने वास्तव परिस्थितीचा विचार करून दुकानदारांना वेठीस धरण्याऐवजी यावर कायमस्वरूपी उपाय शोधावा, अशी मागणी होत आहे. लाभार्थ्यांची अनेक वेळा e-KYC करण्यात आली आहे. धान्य वितरणाच्या प्रक्रियेदरम्यानही e-KYC ची प्रक्रिया करण्यात आली. मग पुन्हा पुन्हा त्याच प्रक्रियेचा ताण दुकानदारांवर का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. रेशन कार्डवरील जे लाभार्थ कायमस्वरूपी बाहेरगावी गेल आहेत किंवा उपलब्ध होत नाहीत त्यांच्या बाबतीत नियमानुसार ना कमी करण्याची अथवा आवश्यत ती प्रक्रिया पूर्ण करण्याची सुविध सुलभ करावी. प्रत्येक वेळ लाभार्थ्यांच्या मागे लागून e-KY( करून घेण्याची जबाबदारं दुकानदारांवर टाकणे कितपर योग्य? असा सवालहं दुकानदारांकडून उपस्थित केल् जात आहे. गरीब कुटुंबातील अनेक लाभार्थी कामानिमित्त बाहेरगावी आहेत.

# ना. मकरंद पाटील यांच्याकडून खडकपूर्णा धरणातील पाणीसाठ्याची पाहणी

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

## योग्य वापराचे प्रशासनाला निर्देश

**देऊळगाव राजा :** दौऱ्यादरम्यान राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यानी देऊळगाव राजा तालुक्यातील खडकपूर्णा धरणाला भेट देऊन तेथील पाणीसाठ्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी धरणातील सद्या पाणीपातळी, उपलब्ध पाणीसाठा तसेच सिंचनासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याची सविस्तर माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.



तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचे आवश्यक आरक्षण प्रथम निश्चित करून उपलब्ध पाण्याच्या वापराचे सुयोग्य नियोजन व आराखडा तातडीने तयार करावा, अशा स्पष्ट सूचना पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या. पाहणी दौऱ्याप्रसंगी आ. श्वेता महाले, आ. मनोज कायंदे, अल्पसंख्यांक प्रदेश अध्यक्ष ॲड. नाझेर काझी, जिल्हाधिकारी डॉ.प्रवीणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, सिंदखेडराजा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसीलदार अजित दिवटे, तहसीलदार विजय सवळे यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुकुंदनगर भागातून 1 लाख 91 हजार रुपयांचा गांजा जप्त 58 वर्षीय आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**मलकापूर:** मलकापूर शहर पोलीस स्टेशन हद्दीत अमली पदार्थांची बेकायदेशीर विक्री होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरून पोलिसांनी मुकुंदनगर परिसरात कारवाई करत सुमारे १ लाख ९१ हजार ५०० रुपये किमतीचा ३ किलो ८३० ग्रॅम गांजा सदृश्य पदार्थ जप्त केला आहे. या प्रकरणी ५८ वर्षीय इसमाविरुध्द अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आज २४ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी हद्दीत गस्त घालत होते. दरम्यान मुकुंदनगर भागात अंमली पदार्थांची साठवणूक आणि विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष आणि राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मुकुंदनगर येथील रहिवासी वासुदेव प्रल्हाद वानखेडे (वय ५८ वर्ष) यांच्या घरावर छापा टाकला. घराच्या गच्चीवर झडती घेतली असता पोलिसांना १ किलो ७३४ ग्रॅम गांजा सदृश्य पदार्थ किंमत ८६ हजार ७०० रूपये , तसेच खाकी रंगाच्या प्लास्टिक टेपने पॅक केलेले बंडल ज्यामध्ये २ किलो ९६ ग्रॅम गांजा सदृश्य पदार्थ किंमत १ लाख ०४ हजार ८०० असा एकूण ३ किलो ८३० ग्रॅम गांजा किंमत १ लाख ९१ हजार ५०० रुपये आढळून आला. या प्रकरणी पोउपनि शुभम चंद्रकांत बरदाडे यांच्या तक्रारीवरून आरोपी वासुदेव वानखेडे याच्याविरुध्द अप नं. ७१२/२०२६, कलम ८(क), २०(ब) (ग्ग्)(ब) गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. अधिक तपास सपोनि देवीदास पाटील करीत आहेत.

सदरची कार्यवाही व तपास निलेश तांबे पोलीस अधिक्षक बुलडाणा, पियुश जगताप अप्पर पोलीस अधिक्षक खामगांव, सोहम माछरे उपविभागिय पोलीस अधिकारी मलकापुर, गणेश गिरी पोलीस निरीक्षक शहर पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे सपोनि. देविदास पाटील व तसेच डिबी पथकाचे पोउपनि शुभम बरदाडे, पोकॉ योगेश तायडे, पोकॉ दिपक सोनोने, पोकॉ प्रविण गवई, पोकॉ नवल राठोड, मपोकॉ मिनल शिंदे यांनी केली.

# पिककर्जाच्या कागदपत्रांसाठी शेतकऱ्यांची धावपळ

**सिंदखेडराजा :** पीककर्जाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांना तहसील कार्यालयासह संबंधित कार्यालयांमध्ये जावे लागत आहे. काही शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, स्टॅम्प पेपरवर हमीपत्र किंवा प्रतिज्ञापत्र सादर करावे लागत आहे. स्टॅम्प पेपर घेतल्यानंतर संबंधित कागदपत्रांची ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुन्हा कार्यालयात जावे लागत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. ऑनलाइन कामकाजादरम्यान सर्व्हर डाऊन असल्यास प्रक्रिया पूर्ण करण्यास विलंब होत असून, त्यासाठी पुन्हा ये-जा करावी लागत असल्याचेही सांगण्यात आले. पीक कर्जाच्या प्रक्रियेसाठी कागदपत्रांची पूर्तता करताना वेळ, प्रवास आणि इतर खर्च होत असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले.

# युवाशक्तीला नेतृत्वाची नवी संधी; माहेश्वरी युवा संघटनेची कार्यकारिणी बिनविरोध!

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**शेगांव:** तालुका माहेश्वरी युवा संघटनेची २०२६-२०२९ या तीन वर्षांच्या कार्यकाळासाठीची वार्षिक निवडणूक सभा माहेश्वरी भवन, शेगांव येथे उत्साहपूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पडली. सर्व पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने संपूर्ण कार्यकारिणीची निवड बिनविरोध करण्यात आली. विशेष म्हणजे, या संघटनेत नवयुवकांसोबत नवयुवती आणि नववधूंनीही हिरिरीने सहभाग नोंदवत विविध महत्त्वाच्या पदांची जबाबदारी स्वीकारली.

या निवडणूक सभेत पर्यवेक्षक म्हणून प्रदीप राठी उपस्थित होते तसेच निवडणूक अधिकारी म्हणून बसंत चांडक यांनी काम पाहिले.



निवडणूक अधिकारी तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडली. सर्व पदांसाठी एकमेव अर्ज आल्याने कोणत्याही मतदानाची आवश्यकता भासली नाही आणि संपूर्ण कार्यकारिणी बिनविरोध घोषित करण्यात आली. संघटनेतील सदस्यांचे ऐक्य, परस्पर सहकार्य आणि सर्वानुमते निर्णय घेण्याची भूमिका यामुळे ही निवडणूक निर्विघ्नपणे पार पडली. विशेष म्हणजे, वैयक्तिक कारणांमुळे सभेला उपस्थित राहू न शकलेल्या काही सदस्यांनाही संघटनेत समतोल प्रतिनिधित्व मिळावे यासाठी कार्यकारिणीत सन्मानाने स्थान देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. या प्रस्तावाला संपूर्ण सदनाने एकमताने मंजुरी दिली. नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी रोहित दामोदरजी भुतडा, सचिवपदी प्रफुल रमेशजी मुहना, उपाध्यक्षपदी कु. कल्याणी श्यामसुंदरजी राठी, कोषाध्यक्षपदी शुभमसिंग महेशसिंगजी मोहता , सहसचिवपदी अंकुश नंदकिशोरजी चांडक, संघटन मंत्रीपदी गोपाल मनीषजी पनपालिया, सांस्कृतिक मंत्रीपदी कु. आशुता गिरीशजी चांडक यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर जिल्हा प्रतिनिधी म्हणून

लोकेश रमेशजी गांधी, संकेत शिवकुमारजी चांडक, मयूर रमेशजी मुहना, संदेश अशोकजी डांगरा, नितीन प्रकाशजी गांधी, आणि श्रीकृष्ण श्यामसुंदरजी राठी यांची माहेश्वरी युवा-युवती संघटनेच्या जिल्हा प्रतिनिधीपदी नियुक्ती करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून समाजातील युवा पिढीला संघटित करून समाजहिताच्या विविध उपक्रमांना चालना देण्यासोबतच युवती व नववधूंच्या सक्रिय सहभागातून संघटनेच्या कार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com




# आर आर सी च्या बाप्पाला भावपूर्ण निरोप



प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अकोला:** ११ दिवस आर आर सी मुख्यालय समोरील मंडपात विराजमान राहिल्यानंतर काल लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. आर आर सी नेटवर्कचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव अतिशय भक्तिभावाने साजरा करण्यात आला.सकाळ संध्याकाळ नित्यनेमाने आरती, गणेश आराधना केली. तर शुक्रवारी दुपारी बाळापूर येथील नदीच्या पात्रात बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या... असे आर्जव करण्यात आले. आर आर सीचे अधिकारी, कर्मचारी, केबल ऑपरेटर उपस्थित होते.



## गणेश घाटावर भाविकांची प्रचंड गर्दी

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

अकोल्यात लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी भाविकांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. गणेश घाटावर सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळत असून, 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आहे. पारंपरिक वाद्यांच्या गजरात भक्तिभावाने बाप्पाला निरोप दिला जात असतानाच, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडूनही चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

अकोल्यात गणेशोत्सवाची सांगता आता भावपूर्ण वातावरणात होत आहे. लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी शहरातील विविध भागातून भाविक मोठ्या संख्येने गणेश घाटावर दाखल होत आहेत.

# रात्री दीड वाजेपर्यंत गणरायाचे विसर्जन

## 60 हुन अधिक मंडळे, सात पेक्षा जास्त आखाड्यांचा सहभाग



प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अकोला :** बारा दिवसांच्या भक्तिमय गणेशोत्सवानंतर अनंत चतुर्दशीच्या दिवशी काल गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. शहरातील गणेश विसर्जन मिरवणुकीत ६० पेक्षा अधिक गणेश मंडळे आणि सात हुन अधिक आखाड्यांनी सहभाग घेतला. सिटी कोतवाली परिसरातून सुरू झालेली ही मिरवणूक ताजना पेठ पोलिस चौकीसमोरून मार्गक्रमण करत गांधी चौक येथे समाप्त झाली. त्यानंतर गणेश मंडळांच्या मिरवणुका आपापल्या विसर्जन घाटाकडे रवाना झाल्या.गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडावी, यासाठी पोलिस प्रशासनाकडून शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मिरवणुकीच्या मार्गावरील तब्बल नऊ प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते. नागरिकांना आणि वाहनधारकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

## तब्बल 2,500 हुन अधिक पोलिसांचा तगडा बंदोबस्त

### अडीच हजार पोलिसांचा बंदोबस्त

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर शहरात सुमारे २,५०० हुन जास्त पोलिस अधिकारी व अंमलदार तैनात करण्यात आले होते. यामध्ये आरसीबीची चार पथके, सात पोलिस उपअधीक्षक, १२७ पोलिस अधिकारी तसेच सुमारे २,३०० पोलिस अंमलदारांचा समावेश होता. संवेदनशील ठिकाणे, मिरवणुकीचा मार्ग आणि विसर्जन घाटांवर पोलिसांचा विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### रात्री दीड वाजेपर्यंत मिरवणूक

गणेश विसर्जनासाठी प्रशासनाने ठरवून दिलेल्या वेळेनुसार रात्री बारा वाजेपर्यंत विसर्जनाची प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, गणेश मंडळांची संख्या आणि मिरवणुकीचा वाढलेला कालावधी यामुळे मिरवणूक रात्री दीड वाजेपर्यंत सुरू होती. त्यानंतर मंडळे आपापल्या विसर्जन घाटाकडे रवाना झाली.

### विशेष पोलिस महानिरीक्षकांची उपस्थिती

गणेश विसर्जन मिरवणुकीच्या बंदोबस्ताचा आढावा घेण्यासाठी विशेष पोलिस महानिरीक्षक महेश पाटील हे ताजना पेठ पोलिस चौकी येथे उपस्थित होते. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मिरवणुकीच्या सुरक्षेचे नियोजन आणि बंदोबस्ताची पाहणी करण्यात आली. गणेशोत्सवाच्या बारा दिवसांनंतर गणरायाला निरोप देताना शहरातील विविध गणेश मंडळांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. पारंपरिक वाद्ये, आखाडे आणि गणेशभक्तांच्या सहभागामुळे मिरवणुकीला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते.

# श्री बाराभाई गणपतीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते पूजन

## पारंपरिक वाद्यांना प्राधान्य डीजेच्या गोंगाटावर बारीक नजर

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अकोला:** राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते अकोला शहरातील पहिल्या मानाच्या श्री बाराभाई गणपती विसर्जन मिरवणुकीत श्रीगणेशाचे पूजन करण्यात आले. जयहिंद चौकात शुक्रवारी सकाळी श्रीगणेशाची महाआरती करण्यात आली. आणि शहरातील श्रींच्या विसर्जन मिरवणुकीला थाटात आरंभ झाला. श्री गणरायाचा जयघोष करण्यात आला.




पहिल्या मानाचा बाराभाई गणपतीचे पूजन झाल्यावर विसर्जन मिरवणुकीला थाटात सुरूवात झाली. यावेळी खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार साजिद खान पठाण, महापौर शारदा खेडकर, माजी आमदार अमोल मिटकरी, बबनराव चौधरी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंग मोहता यांच्यासह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मिशन महाग्रामला मुदतवाढ

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाच्या टप्पा-२ अंतर्गत 'मिशन महाग्राम'चा कालावधी २०२२–२०२५ असा मंजूर होता; तो आता वर्ष २०२९ पर्यंत वाढविण्यास मंत्रिपरिषदेने मान्यता दिली आहे. ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक परिवर्तनाला गती देण्यासाठी 'मिशन महाग्राम' राबविण्यात येते. पाणी, आरोग्य, स्वच्छता, पर्यावर, कृषी, कौशल्यविकास आणि डिजिटल् कनेक्टिव्हिटी या क्षेत्रांतील विकासाला अभियानातून प्राधान्य दिले जाते.






## अकोल्यातील मानाच्या गणपतींचा मानाचा वारसा

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

गणेशोत्सव म्हटलं की अकोलेकरांची श्रद्धा, परंपरा आणि उत्साह यांची अनोखी सांगड पाहायला मिळते. अकोल्याच्या गणेशोत्सवाला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला असून, या परंपरेमध्ये मानाच्या गणपतींना विशेष स्थान आहे. त्यात सर्वात अग्रस्थानी आहे ते अकोल्याचे ऐतिहासिक श्री बाराभाई गणपती. तब्बल १३६ वर्षांची परंपरा जपत आजही हा मानाचा बाप्पा अकोलेकरांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू ठरतो.

अकोल्यातील गणेशोत्सवाला केवळ उत्सवाचे स्वरूप नाही, तर त्यामागे अनेक वर्षांची श्रद्धा, परंपरा आणि ऐतिहासिक वारसा जोडलेला आहे. या परंपरेमध्ये श्री बाराभाई गणपतीला सर्वांत अग्रमानाचे स्थान आहे. जुने शहरातील जयहिंद चौक परिसरातील श्री बाराभाई गणपतीची परंपरा १३६ वर्षांपासून सुरू असल्याचे उपलब्ध ऐतिहासिक संदर्भ सांगतात. पेशवेकालीन बाराभाईच्या इतिहासाशी या गणपतीच्या नावाचा संबंध असल्याचे जाणकारांचे मत आहे. अकोल्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीतही श्री बाराभाई गणपतीला पहिला मान दिला जातो. विशेष म्हणजे या मानाच्या मूर्तीचे गेल्या शंभर वर्षांहून अधिक काळापासून विसर्जन केले जात नाही. जुन्या मूर्तीकारांच्या परंपरेशी संबंधित कारणांमुळे ही मूर्ती जतन करण्यात आली .

## ट्रॅक्टरची गॅस टाकी फुटून दोघांचा मृत्यू

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**यवतमाळ :** उमरखेड शहरातील ढाणकी रोडवर बैलबाजारसमोर ट्रॅक्टरला वेल्डिंगचे काम सुरू असताना गॅस टाकीचा भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत दोन जणांचा जागीच होरपळून मृत्यू झाला असून पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी २६ सप्टेंबर रोजी घडली.

उमरखेड शहरातील ढाणकी रोडवरील वेल्डिंग वर्कशॉपमध्ये ट्रॅक्टरच्या गॅस टाकीवर वेल्डिंगचे काम सुरू होते. त्याचवेळी अचानक गॅस टाकीचा स्फोट झाल्याने परिसरात मोठा आवाज झाला. स्फोटाच्या तीव्रतेमुळे वर्कशॉपमधील दोन व्यक्तींचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य पाच जण गंभीररीत्या जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

## पारंपरिक पद्धतीने बाप्पांना निरोप

### गणेश विसर्जन मिरवणुकीत विजय अग्रवाल यांचा ठेका

प्रतिनिधी २६ सप्टेंबर

**अकोला:** गणरायाचे विसर्जन भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाले. पारंपरिक पद्धतीने गणपती बाप्पांना निरोप देताना अकोला स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनीही दिंडीच्या ठेक्यावर ठेका धरत उत्साहात सहभाग नोंदवला. गणपती बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांचा गजर आणि भक्तांचा उत्साह पाहायला मिळाला.












हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135